cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–८५ सोमवार दि.१५ जुलै २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

## संपादकीय

### सामाजिक सलोखा जपला जावा

महाराष्ट्राचे राजकारण गेल्या काही महिन्यांपासून आरक्षण या विषयावरून पुन्हा एकवार नव्याने ढवळून निघाले आहे. राज्याच्या पावसाळी अधिवेशनातही त्याचे पडसाद उमटले. अगदी विधान परिषद सभागृहात मार्शल बोलवावे लागण्याइतपत हमरीतुमरी व गोंधळ वाढत गेला. आरक्षण हा विषय काश्मीर प्रश्नांप्रमाणेच चिघळण्याची शक्यता आहे. हे प्रकरण न्यायप्रवीष्ट असल्याने न्यायालयीन निकालाची वाट प्रत्येकानेच पाहणे अपेक्षित आहे.

### मणिपूरमध्ये सीआरपीएफच्या ताफ्यावर हल्ला

नवी दिल्लीः मणिपूरमधील जिरिबाम येथे केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ) आणि राज्य पोलिसांच्या संयुक्त पथकावर ताफ्यावर अज्ञात सशस्त्र हल्लेखोरांनी रविवार (दि.१४) हल्ला केला. यामध्ये सीआरपीएफचा एक जवान शहीद झाला. तर तीन पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. दरम्यान, मणिपूर पोलिसांनी रविवारी सांगितले की, इम्फाळ पूर्व आणि पश्चिम जिल्ह्यातून शस्त्रसाठा जप्त केला असून, यामध्ये एके-५६ रायफल, एक सेल्फ-लोडिंग रायफल, एक स्थानिक, अनेक पिस्तूल, हँडग्रेनेड आणि २५ राऊंड्सचा समावेश आहे.

# शेतकरी सन्मान निधीच्या कामावर कृषी विभागाचा बहिष्कार !

## अपुऱ्या मनुष्यबळाचे कारण | शेतकऱ्यांची कामे खोळंबली | महसूल विभागाने जबाबदारी झटकली

पुणे । प्रतिनिधी

संपूर्ण राज्यभरात शेतकरी सन्मान निधीच्या कामावर कृषी विभागाने बहिष्कार टाकला आहे. यामुळे राज्यभरातील शेतकरी अडचणीत सापडले आहेत. त्यामुळे डेटा एंट्रीतील चुका आणि ई केवायसी दुरूस्तीचे काम थांबले आहे. यामुळे शेतकरी



चांगलेच अडचणीत आले आहेत. शेतकरी सन्मान योजनेसाठी राज्यभरात महसूलची जबाबदारी कृषी विभागावर टाकण्यात आली आहे. मात्र कृषी विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ नाही.

सध्या शेतकरी सन्मान निधीच्या याद्या दुरूस्त करण्यासाठी ◀◀ पान २ वर

### कृषी विभागावर खापर

आधी ही योजना महसूल विभागाकडे होती. महसूल, ग्रामविकास आणि कृषी विभाग अशा संयुक्त विद्यमाने त्याचे काम होत होते. शेतकऱ्यांच्या नावाचा डेटा महसूल यंत्रणेने डाऊनलोड केला आहे. ही योजना कृषी विभागाकडे हस्तांतरित झाल्यानंतर त्यात अनेक त्रुटी येत आहेत. याला कृषी विभागाला जबाबदार धरले जात आहे..

### महसूल-कृषी विभागात जुंपली

महसूल विभागाने शेतकरी सन्मान ही शेतकऱ्यांची योजना आहे म्हणून काम कृषी विभागाकडे दिले. याचवेळी शेतकरी सातबारा स्वत:कडे ठेवला. यामुळे आम्हाला सातबाराही द्या, तो कृषीचा आहे. तुम्ही का ठेवला असा प्रश्न संघटनेने केला आहे.

# एक मेला तरी चालेल; पण कोट्यवधी जगले पाहिजेत – मनोज जरांगे पाटील

## २० जुलैपासून कठोर उपोषण करणार

जालना । प्रतिनिधी

'समाज बांधव मला विनंती करत होते की मी उपोषण करू नये. मात्र मी त्यांचे मन बदलले. लाख मेले तरी चालतील लाखांचा पोशिंदा जगलाच पाहिजे. मात्र मला असे वाटते कोट्यवधी लोक जगले



पाहिजेत माझ्या सारखा एक मेला तरी चालेल. माझे बलिदान दिले तरी चालते; पण समाज मोठा झाला पाहिजे. त्यासाठी परत एकदा उपोषण करू असे मी ठरवले आहे.

२० जुलैपासूनचे उपोषण कठोर असणार असल्याचा निर्धार मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी रविवारी (दि. १४) रोजी केला.

◀◀ पान २ वर

# धनंजय मुंडे - शेतकऱ्यांच्या विकासाचे मंत्री नव्हे मंत्र!

**धनंजय मुंडे हे नाव घेतलं की सगळ्यात अगोदर डोळ्यासमोर त्यांचं रुबाबदार व्यक्तिमत्व, त्यांचं बहारदार व खास शैलीतील वक्तृत्व आणि त्यांचे विकासाभिमुख नेतृत्व या बाबी सर्वांच्या लक्षात येतात.**

अनेक वर्ष संघर्षात घालवल्यानंतर प्रथमच सत्तेत आल्यावर धनंजय मुंडे यांनी सुमारे अडीच वर्षे सामाजिक न्याय विभागाचा पदभार सांभाळला. त्यावेळी ३२ नंबरचे समजले जाणारे सामाजिक न्याय हे खाते मी एवढे प्रतिष्ठित करून दाखवेल की स्वतः राज्याचे मुख्यमंत्री हे खातं स्वतःकडे ठेवतील असं जाहीरपणे आमचे साहेब म्हणाले



आणि पुढील अडीच वर्षात त्यांनी ते करूनच दाखवलं! महायुतीच्या सरकारमध्ये मुंडे साहेबांकडे कृषी खाते आले. शेतकऱ्यांवर सातत्याने येणारी नैसर्गिक संकटे आणि नैसर्गिक असमतोल यामुळे नेहमीच कृषिमंत्री हे टीकेचे धनी असतात. मात्र संकटांना विरोधातपणे कसे सामोरे जायचे आणि त्यातून प्रगती आणि विकासाचा नवा मार्ग कसा शोधायचा हे 'मुंडे' यांना चांगले जमते. अलीकडच्या काळात मुंडे साहेब कृषी मंत्री झाल्यापासून पीएम किसान सारखी शेतकऱ्यांना थेट अर्थ ◀◀ पान २ वर

●प्रशांत भास्करराव जोशी







cmyk

## अग्रलेख

# सामाजिक सलोखा जपला जावा

महाराष्ट्राचे राजकारण गेल्या काही महिन्यांपासून आरक्षण या विषयावरून पुन्हा एकवार नव्याने ढवळून निघाले आहे. राज्याच्या पावसाळी अधिवेशनातही त्याचे पडसाद उमटले. अगदी विधान परिषद सभागृहात मार्शल बोलवावे लागण्याइतपत हमरीतुमरी व गोंधळ वाढत गेला. आरक्षण हा विषय काश्मीर प्रश्नांप्रमाणेच चिघळण्याची शक्यता आहे. हे प्रकरण न्यायप्रवीष्ट असल्याने न्यायालयीन निकालाची वाट प्रत्येकानेच पाहणे अपेक्षित आहे. मुळात आरक्षण हा विषय मराठा समाजातील विविध घटकांनी गेल्या काही वर्षांपासून लावून धरला असला तरी मनोज जरांगेंनी आरक्षण विषयात प्रवेश केल्यापासून या विषयाला धार आली आहे. आरक्षण मिळणे व ते मिळविण्यासाठी संसदीय आयुधांचा कायदेशीर वापर करून मागणी लावून धरणे योग्य आहे, पण त्यासाठी कायदा व सुव्यवस्था वेठीस धरणे योग्य नाही.

राज्य सरकारने आयोजित केलेल्या आरक्षण विषयावरील बैठकीत विरोधी पक्षांनी सहभागी होणे आवश्यक होते. आरक्षण विषयाला चालना देण्यासाठी राज्य सरकारने ते एक प्रकारचे विरोधकांना व्यासपीठच उपलब्ध करून दिलेले होते. आपली भूमिका मांडणे, आरक्षणाची गरज व तीव्रता पटवून देण्याची ती एक अनायसे चर्चेच्या माध्यमातून संधी उपलब्ध झालेली होती. पण ती संधी विरोधकांनी डावलली व त्याचे आयते कोलित सत्ताधारी सदस्यांना उपलब्ध झाले.

मुळातच आरक्षण विषयाला जातीय झालर असल्याने व अवघ्या तीन महिन्यांवर महाराष्ट्र राज्याच्या सार्वत्रिक निवडणुका आल्या असल्याने ओबीसी व मराठा या दोन्ही समाजाला निवडणुकीच्या तोंडावर न दुखवता त्यांना झुलवत ठेवण्याचे राजकारण राजकीय व्यासपीठावरून सुरू झालेले आहे.

मुळातच मराठा समाज हा धनाढ्य व अर्थकारणात समृद्ध असलेला समाज आहे, मात्र आता हाताच्या बोटावर मोजण्याइतपत मराठा समाजातील घटक सोडले, तर उर्वरित मराठा समाजाला आज जीवन जगण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. आरक्षण मिळाल्याने मराठा समाजाचे सर्व प्रश्न सुटतील असाही प्रकार नसल्याने आरक्षणप्रकरणी प्रत्येकानेच ताठर भूमिका सोडून काही प्रमाणात लवचिक भूमिकेचा स्वीकार करणे आवश्यक आहे. मुळात आज शासकीय नोकऱ्या संपुष्टात आल्याने आरक्षण मिळूनही शासकीय नोकऱ्या मिळणे दुरापास्तच असल्याची जाणीव मराठा समाजालाही झालेली आहे. केवळ शैक्षणिक आरक्षणासाठी आज मराठा समाज आग्रही असल्याचे एव्हाना स्पष्ट झालेले आहे. वैद्यकीय व अभियांत्रिकी तसेच अन्य शैक्षणिक प्रकारामध्ये गुणवत्ता असूनही प्रवेश मिळत नाही. प्रवेश मिळालाच तर अन्य समाजातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत मराठा समाजातील विद्यार्थ्यांना भरमसाट शैक्षणिक शुल्क भरावे लागते व हीच फी भरताना पालक वर्गाचे कंबरडे मोडते. इतर समाजातील मुलांना आरक्षणामुळे त्यांची शैक्षणिक प्रवेशप्रक्रिया सुलभ होते. या दुजाभावामुळेच मराठा समाजाला आज आरक्षणाची गरज भासू लागली आहे. आर्थिक निकषावर राज्य सरकारने यापूर्वीच आरक्षण दिले असले तरी मराठा समाजाला आता जातीच्या निकषावर आरक्षण हवे आहे व त्यासाठीच मराठा समाज आग्रही भूमिका मांडत आक्रमक झालेला आहे. मराठा आरक्षणासाठी लढा देणारे घटक ओबीसीमधूनच मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी करू लागले आहेत. कारण आरक्षणाची मर्यादा आता ५०% पलीकडे गेलेली आहे. मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण दिल्यास ते न्यायालयीन पातळीवर टिकणार नाही, फेटाळले जाणार, हे मागील अनुभवावरून मराठा समाजाला समजून चुकले आहे. त्यामुळे ते पुन्हा असा धोका पत्करण्यास तयार नाहीत. ओबीसी समाजामध्ये जवळपास दोनशेहून अधिक जातींचा समावेश असल्याने ते आपल्या आरक्षणामध्ये मराठा समाजाला सामावून घेण्यास तयार नाहीत. त्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून मराठा व ओबीसी समाजामध्ये जोरदार संघर्ष निर्माण होऊन राजकीय कलगीतुरा झडू लागला आहे. मुळात मराठा समाज हा पूर्वी शेती करत असल्याने त्याची अगदी काही दशकांपूर्वी कुणबी अशी कागदोपत्री नोंदही होती. शेती करणारा शेतकऱ्याची त्याकाळी कुणबी अशी कागदोपत्री नोंदही करण्यात आली होती. कुणबी ही जात ओबीसीमधील एक होती. कालपरत्वे कुणबीचा मराठा असा उल्लेख कागदोपत्री होऊ लागल्याने या समाजाला आरक्षणप्रक्रियेतून वगळण्यात आले होते. त्यामुळे आपणाला कुणबीच्या निकषावर आरक्षणात सामावून घेण्याची मागणी मराठा समाजाकडून करण्यात येत आहे.

ओबीसी समाजामध्ये २०० हून अधिक जाती-जमातींचा समावेश असला तरी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यास माळी समाजातील घटकांचाच जोरदार विरोध होत असल्याचे दिसून येत आहे. त्याला कारणही तसेच आहे. ओबीसी समाजामध्ये अनेक जातींचा समावेश असला तरी आजवर अन्य जातींच्या तुलनेत माळी समाजालाच या ओबीसी आरक्षणाचा फायदा झालेला आहे. त्यामुळे मराठा आरक्षणप्रकरणी माळी समाज जितक्या तीव्रतेने आपली भूमिका मांडत आहे, मुळात मराठा समाजाला आरक्षण द्यावे, अशी भूमिका ओबीसी समाज मांडत असला तरी त्यांना ओबीसीतून आरक्षण देण्यास त्यांचा विरोध आहे. मराठा समाजालाही कळून चुकले आहे की, स्वतंत्र आरक्षण मिळाल्यास आरक्षणाची टक्केवारी वाढून ते आरक्षण न्यायालयात फेटाळले जाईल, याची त्यांना खात्री आहे. यामुळे हा पेच दोन्ही घटकांनी समजून घेऊन संयम राखत सामाजिक ऐक्य टिकविण्याचा प्रयत्न करायला हवा.

# आष्टी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या तालुका अध्यक्षपदी काकासाहेब शिंदे



**आष्टी प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या आष्टी तालुका अध्यक्ष पदाच्या निवडीचे पत्र जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण यांच्या हस्ते ज्येष्ठ नेते काकासाहेब शिंदे यांना देण्यात आले यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष भाऊसाहेब घुले युवा नेते कृष्णा मिसाळ उपस्थित होते .आष्टी तालुक्यातील चिखली येथील एक प्रामाणिक कार्यकर्ता म्हणून काकासाहेब शिंदे यांची मतदारसंघात ओळख आहे आमदार बाळासाहेब आजबे यांचे खंदे समर्थक व सामाजिक कार्यात ही नेहमी अग्रेसर असणारे काकासाहेब शिंदे यांची आष्टी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याने समाजातील विविध वर्गातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे यावेळी बोलताना काकासाहेब शिंदे यांनी सांगितले की राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे पालकमंत्री धनंजय मुंडे व आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे कर्तव्यदक्ष आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या मार्गदर्शनाखाली आपण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे विचार तळागाळापर्यंत पोहोचण्याचे प्रामाणिक काम करणार असून सर्वांना बरोबर घेऊन आष्टी तालुक्यामध्ये सर्व समावेशक काम करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले .

# १८ पगड जातींच्या गराड्यातला ‘जगमित्र’...!

***आज-काल महाराष्ट्रात व विशेष करून आपल्या मराठवाड्यात माणसाचे नाव घ्यायच्या आधी त्याची जात माहित केली जाते. जातीजातींचे समीकरण इतके घन होत चालले आहे की एका ताटात जेवणाऱ्या दोन जातीतील मित्रांचा सुद्धा एकमेकांवर आता विश्वास उरला नाही. या सगळ्यांमध्ये मूळ आरक्षणाची मागणी बाजूला राहून आता जाती-जातीत संघर्ष पेटण्याची वेळ आली आहे. प्रत्येकालाच आपली स्वतःची जात प्रिय असते मात्र त्याचबरोबर दुसऱ्याच्या जातीचाही आदर - सन्मान करून एकमेकांमधील विश्वास टिकवता आला पाहिजे.***

सर्व जातींचा सन्मान आणि आपल्या अवतीभवती सन्मानाची जागा मिळवून देत या विश्वासाला आणि आपसातील बंधू भावाला धनंजय मुंडे या नेतृत्वाने कायमच प्राधान्य दिलेलं आहे. मागे लोकसभा निवडणुकीच्या काळात अनेकांची जात काढण्यात आली आणि कोणत्या जातीला जिल्ह्यात किती महत्त्व आहे यावरूनही रणकंदन झाले. धनंजय मुंडे यांचे खाजगी सचिव यांच्यापासून ते सुरक्षा रक्षक, केअर टेकर, वाहन चालक ते अगदी जेवण बनवणारे आमचे सय्यद मामा यांच्यापर्यंत सर्व जाती-धर्मातील सदस्य सावली सारखे सोबत असतात. धनंजय मुंडे यांच्या पदाधिकारी व कारभारी मंडळींमध्ये त्याचबरोबर त्यांच्या जवळच्या मित्रपरिवारात देखील सर्व जाती-धर्मातील प्रतिनिधी आढळून येतात. इतकेच नाही तर धनंजय मुंडे ज्या व्यक्तीला नगराध्यक्ष करण्यासाठी स्व.गोपीनाथराव मुंडे साहेबांपासून वेगळे झाले ते सुद्धा कुणी वंजारी नव्हते. अशी असंख्य नावे व उदाहरणे आहेत. धनंजय मुंडे यांच्या सोबतीने सावलीसारखे ही सर्व मंडळी खांद्याला खांदा लावून प्रत्येक निवडणुकीत, प्रत्येक लढाईत सोबत असतात. धनंजय मुंडे यांनी देखील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सत्ता आली तेव्हा आणि पक्ष आपल्या या सर्व शिलेदारांना बरोबरीने सत्तेचा वाटा देऊन सोशल इंजिनिअरिंग साधलेली आहे. म्हणूनच परळी मतदारसंघ एकीने आपल्या नेक लेकाला कायम साथ देत आला आहे. आपलं घर, घरातल्या किचनपासून जाती मुक्त ठेवणारा व सर्वधर्मसमभाव जपणारा हा माणूस जातीयवादी कसा असू शकतो? ज्या माणसाने कधी निधी वाटपात, कुठल्याही शासकीय संस्थेत पद देताना किंवा पक्षाचे पद देताना जात नाही तर काम पाहिले, याची साक्ष कितीतरी जण उघडपणे देतील! त्या कोविडच्या काळात आठवा कुणाची जात पाहिली मदत करताना? सर्वांना बरोबरीने समान संधी निर्माण करून देणारे असे लोकनेतृत्व नशिबाने व दीर्घ काळाने लाभते. खरंतर अशा नेतृत्वाची उंची आपण आपले पाठबळ सर्वशक्तीने पाठीशी उभे करून दाखवायची हीच ती वेळ असावी. समस्त परळी मतदारसंघ आणि बीड जिल्हा आगामी काळात ते दाखवून देईल असा विश्वास वाटतो. लोकनेतृत्वाकडे आशा अपेक्षा सर्वांच्या असतात. त्या वेळोवेळी पूर्णही होत असतात. खरी गरज असते माणसातला ’जगमित्र’ ओळखून त्यांच्या सोबतीला आपण आपला विश्वास आणि आपली निष्ठा कायम अबाधित ठेवण्याची. आगामी काळात सर्वजण मिळून ते सिद्ध करतीलच! शेवटी कसंय ना, नेते अनेक असतात, निवडणूका अनेक असतात, पण सर्वांना सोबत घेऊन चालणारा, अठरा पगड जातींच्या गराड्यात सर्वांना प्रगतीसाठी झटणारा ’जगमित्र’ कोट्यावधी लोकांमध्ये एकच असतो! उच्च विचारसरणी, मनात कायम आपल्या मातीशी व मातीतील माणसाशी इमान आणि कितीही मोठ्या पदावर असले तरी पाय जमिनीवर... अशा मोठ्या मनाच्या राजा माणसाला जन्मदिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!



**सुधीर सांगळे**

# खऱ्या शिवसेनेचा फैसला आता आणखी लांबणीवर!

## सर्वोच्च न्यायालयाने दिली पुढील महिन्याची तारीख

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**शिवसेना पक्षात फूट पडून दोन वर्षे उलटली मात्र अद्याप खरी शिवसेना कोणाची, यावर ठोस फैसला झालेला नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेना पक्षाचे मूळ नाव व चिन्ह बहाल केले, तर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला ‘शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे’ हे नाव तर ‘मशाल’ हे चिन्ह मिळाले. निवडणूक आयोगाच्या या निर्णयाविरोधात ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. यावर सर्वोच्च न्यायालयात १५ जुलै रोजी सुनावणी पार पडणार होती, मात्र आता ही सुनावणी महिनाभर लांबणीवर पडणार आहे. नवीन तारखेनुसार आता खऱ्या शिवसेनेचा फैसला १४ ऑगस्ट रोजी होणार आहे.**



आमदार, खासदारांच्या बहुमताच्या जोरावर एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हावर दावा सांगितला होता. यानंतर निवडणूक आयोगाने पक्ष आणि चिन्ह शिंदे गटाला दिले. या निर्णयाविरोधात शिवसेना ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर आता १४ ऑगस्ट रोजी सुनावणी होणार आहे. त्यामुळे शिवसेना पक्ष आणि चिन्हाचे भवितव्य एक महिन्यानंतर सुप्रीम कोर्टात ठरणार आहे. याबाबत सुप्रीम कोर्टाच्या वेबसाईटवर तारीखही अपडेट करण्यात आली आहे. या सुनावणीकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणावर निर्णय देताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ठाकरे गट आणि शिंदे गट अशा दोन्ही बाजूंच्या आमदारांना पात्र ठरवले होते. विधानसभा अध्यक्षांच्या या निकालाविरोधात शिवसेना ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. सर्वोच्च न्यायालयात शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणावर १९ जुलैला सुनावणी होणार होती. आता ही सुनावणी २३ जुलै रोजी होणार आहे. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयात शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणावर सुनावणी झाली तेव्हा विधानसभा अध्यक्षांसमोर झालेल्या सुनावणीतील मूळ कागदपत्रे सर्वोच्च न्यायालयाने मागवली होती. आता सर्वोच्च न्यायालयात शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणावर येत्या २३ जुलैला सुनावणी होणार आहे. २३ जुलैला ही सुनावणी झाल्यास ही याचिका सर्वोच्च न्यायालयात ठेवावी की उच्च न्यायालयात पाठवावी, याबद्दलचा निर्णय होण्याची शक्यता आहे.

# विवाहित डॉक्टर महिलेचा हुंड्यासाठी छळ

## हुंडा प्रतिबंध कायद्यानव्ये गुन्हा दाखल

**परळी । प्रतिनिधी**

**परळी शहरातील शिवाजी नगर भागात वास्तव्यास असलेल्या डॉक्टर महिलेचा देगलूर तालुक्यातील भुतन हिप्परगा येथील नामदेव सूर्यवंशी नामक व्यक्तीशी विवाह झाला.विवाह पश्चात २० लाखाची मागणी करत डॉक्टर असलेल्या विवाहितेचा छळ करण्यात आला असल्याने पीडित डॉक्टर महिलेने सासरच्या मंडळींवर गुन्हा दाखल केला.**

मिळालेल्या महितीनुसार शहरातील शिवाजी नगर भागात वास्तव्यास असलेल्या डॉक्टर महिलेचा १२ वर्षांपूर्वी भूतन हिप्परगा ता देगलूर येथील नामदेव सुर्यवंशी यांच्याशी विवाह झाला. विवाहानंतर सासरच्या मंडळींनी दवाखाना बांधण्यासाठी व नौकरीसाठी माहेरवरून २० लाख रु घेऊन ये अशी मागणी करत शारीरिक व मानसिक छळ करत मारहाण व शिवीगाळ करून पैसे आण नसता घरातून निघून जा अशी धमकी दिली. पीडित महिलेने सर्व त्रास असाह्य झाल्याने परळी येथील संभाजी नगर पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दिली असून विवाहित डॉक्टर महिलेच्या तक्रारीवरून संभाजी नगर पोलीस ठाण्यात गुरन ११४/२०२४ कलम ४९८अ, ३२३, ५०४, ५०६,३४ भादवी सह कलम ४ हुंडा बंदी अधिनियम १९६१ कायदानव्ये १) नामदेव मल्लु सुर्यवंशी २) रघुनाथ मल्लु सुर्यवंशी ३) लक्ष्मीबाई मल्लु सुर्यवशी ४) प्रतिभा रघुनाथ सुर्यवंशी ५) अनिता मल्लु सुर्यवंशी ६) कविता सुर्यवंशी सर्व रा.भुतन हिप्परगा ता. देगलुर जि. नांदेड यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी अधिक तपास ठाण्याचे कर्मचारी मुंडे हे करीत आहेत.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१३ जुलै २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ६.५० क्विंटल | २,२९० | २,२९० | २,२९० |
| ज्वारी/हायब्रिड :७८.५० क्विंटल | २,००० | २,८३१ | २,४१४ |
| मूग : १.०० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : ०.५० क्विंटल | ८,८०१ | ८,८०१ | ८,८०१ |
| उडीद : १.५० क्विंटल | ७,०५१ | ७,०५१ | ७,०५१ |
| बाजरी: ८.५० क्विंटल | २,४८० | २,८०० | २,६४६ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १.५० क्विंटल | ४,३०० | ४,३०० | ४,३०० |
| हरभरा: ३.५० क्विंटल | ४,००० | ६,५०० | ५,७०० |

# अखेर ४६ वर्षांनंतर जगन्नाथ मंदिराचे रत्न भांडार उघडले



**पुरी । प्रतिनिधी**

**ओडिशातील पुरी येथील भगवान जगन्नाथ मंदिराचा प्रतिष्ठित खजिना रत्न भांडार रविवारी उघडला आहे. राज्य सरकारने हा खजिना तब्बल ४६ वर्षांनंतर दागिने आणि इतर मौल्यवान वस्तूंच्या यादीसाठी खुला केला आहे. यापूर्वी तो १९७८ मध्ये उघडण्यात आला होता.**

चार धामांपैकी एक असलेले जगन्नाथ मंदिर १२ व्या शतकात बांधले गेले. या मंदिरात रत्नांचे भांडार आहे. जगन्नाथ मंदिरातील जगन्नाथ, बलभद्र आणि सुभद्रा या तिन्ही देवतांचे दागिने या रत्नांच्या भांडारात ठेवण्यात आल्याचे सांगितले जाते. अनेक राजे आणि भक्तांनी दागिने अर्पण केले होते, ते सर्व येथे ठेवले आहेत. या रत्नांच्या भांडारात असलेल्या दागिन्यांचे मूल्य अनमोल असल्याचे सांगितले जाते. आजपर्यंत त्याचे मूल्यमापन झालेले नाही. हे ऐतिहासिक भांडार जगन्नाथ मंदिराच्या जगमोहनच्या उत्तरेकडील तीरावर आहे. पुरी श्री जगन्नाथ मंदिर अधिनियम, १९५२ अंतर्गत तयार केलेल्या अधिकारांच्या नोंदीमध्ये भगवान जगन्नाथाच्या दागिन्यांची यादी समाविष्ट आहे. मंदिर व्यवस्थापन समितीचे प्रमुख अरविंद पाधी यांनी सांगितले की, यापूर्वी रत्न भंडार १९०५, १९२६ आणि १९७८ मध्ये उघडण्यात आले होते आणि मौल्यवान वस्तूंची यादी तयार करण्यात आली होती. रत्न भांडार शेवटचे १४ जुलै १९८५ रोजी उघडण्यात आले होते. त्यावेळी ती दुरुस्त करून बंद करण्यात आली होती. यानंतर रत्न भांडार कधीच उघडले नाही आणि त्याची चावीही गायब आहे. ४ एप्रिल २०१८ रोजी रत्न भांडारच्या चाव्या हरवल्याची माहिती समोर आली होती. यानंतर नवीन पटनायक यांनी या प्रकरणाच्या न्यायालयीन चौकशीचे आदेश दिले होते. नोव्हेंबर २०१८ मध्ये आयोगाने ३२४ पानांचा अहवाल सादर केला. अहवालाच्या काही दिवसांनंतर, पुरीच्या तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांना गूढपणे चाव्यांचा एक लिफाफा मिळाला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही हा मुद्दा उपस्थित केला होता. २० मे २०२४ रोजी मोदींनी जगन्नाथ मंदिर सुरक्षित नसल्याचे म्हटले होते.

### रत्न भांडारात किती खजिना?

श्री जगन्नाथ मंदिर प्रशासनाने उच्च न्यायालयात दिलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार रत्न भांडारमध्ये तीन खोल्या आहेत. आतील खोलीत ५० किलो ६०० ग्रॅम सोने आणि १३४ किलो ५० ग्रॅम चांदी आहे. हे दागिने कधीही वापरले गेले नाहीत. बाहेरील खोलीत ९५ किलो ३२० ग्रॅम सोने आणि १९ किलो ४८० ग्रॅम चांदी आहे. हे सणासुदीला काढले जातात. तर तिसऱ्या खोलीत तीन किलो ४८० ग्रॅम सोने आणि ३० किलो ३५० ग्रॅम चांदी आहे. हे दागिने दैनंदिन विधींसाठी वापरले जातात.

### आता का उघडले जात आहे?

१९७८ पासून मंदिराकडे किती मालमत्ता आली याचा अंदाज नाही. १२ व्या शतकात बांधलेले जगन्नाथ मंदिर हे चार धामांपैकी एक आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत रत्न भांडार उघडणे हा मोठा मुद्दा होता. ओडिशात सरकार आल्यास तिजोरी उघडली जाईल, असे आश्वासन भाजपने दिले होते. याआधी २०११ मध्ये तिरुअनंतपुरमच्या पद्मनाभ स्वामी मंदिराचा खजिना उघडण्यात आला होता. त्यानंतर १.३२ लाख कोटी रुपयांचा खजिना असल्याचे समोर आले होते.

## पान १वरून...

### शेतकरी सन्मान निधीच्या कामावर

कृषी विभागाकडे लॅपटॉप नाही. या परिस्थितीत संपूर्ण योजना कृषी विभागाकडे हस्तांतरित झाली आहे. ही योजना हस्तांतरित करताना कृषी विभागाला रिक्त पदे भरली जातील असा शब्द देण्यात आला होता. प्रत्यक्षात अतिरिक्त मनुष्यबळ मिळाले नाही. उलट अतिरिक्त काम वाढले. यातून योजनेच्या कामावर बहिष्कार टाकला आहे. योजना हस्तांतरित होण्यापूर्वी तांत्रिक मनुष्यबळाचा विचार होणे अपेक्षित होते. अधिवेशनामध्ये कृषिमंत्र्यांनी मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. मात्र त्याचा अध्यादेश निघेपर्यंत बहिष्कार कायम राहणार आहे असे कृषी विभागाकडून सांगण्यात येत आहे.

--------

### एक मेला तरी चालेल;

माध्यमांशी बोलताना जरांगे-पाटील म्हणाले, आपल्या उपोषणाने सरकार शहाणे झाले तर ठीक, अन्यथा आपण मुंबईला कधी जायचे. येथे बैठक कधी घेयचे हे ठरवू. २० तारखेनंतरच्या बैठकीबाबत अंतिम निर्णय घेवून भूमिका स्पष्ट केली जाईल. अल्टीमेटम संपल्यानंतर सरकारकडून कोणत्याही प्रकारचा संपर्क झालेला नाही, असेही त्यांनी सांगितले. धनगर समाजाला वाटते एसटीतून आरक्षण मिळाले तर आपल्या लेकरांना आणखीन सुविधा मिळतील. या आरक्षणामध्ये हे काही खाऊ देत नाही. त्यामुळे त्यांचा आग्रह तिथे आहे, छगन भुजबळ यांनी गोरगरिबांना एसटीतून आरक्षण मिळावे यासाठी काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. भुजबळ यांनी सामान्य धनगर बांधवांचा असा उपयोग करून घेऊ नये आणि स्वतःचा राजकीय फायदा उचलू नये. मराठा आणि धनगर कधी वैर नव्हते आणि छगन भुजबळ यांनी आमचे वैर लावू नये. असेही ते म्हणाले. शंभूराजे देसाई यांनी सरकारचे काम सुरू आहे जरांगे पाटील यांनी संयमाने घ्यावे असे विधान केले होते यावर बोलताना जरांगे - पाटील म्हणाले की, ‘‘मला माझ्या समाजासाठी काम करणे महत्त्वाचे आहे. एक महिन्याचा वेळ दिला होता. या महिन्यात काय झालं काय केले हे आमच्या लक्षात आले आहे. आम्हाला १३ तारखेपर्यंत आरक्षण मिळणार नाही हे कळाले. बाकी आम्ही तुम्हाला दोष देत नाही आणि देऊन उपयोगही नाही. आजपासून आमची पुढची रणनीती सुरू झाली, आम्ही संयम बाळगलेला आहे, असे ते म्हणाले.

----------

### धनंजय मुंडे - शेतकऱ्यांच्या

सहाय्य देणारी योजना दुप्पट करून राज्य सरकारच्या माध्यमातून चालवणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. त्याचबरोबर केवळ एक रुपया भरून शेतकऱ्यांना विमा भरता येईल असेही महाराष्ट्र देशातील एकमेव राज्य आहे हे स्वतः केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान साहेब यांनी दोन दिवसांपूर्वी दिल्लीत जाहीरपणे सांगितले. आत्ता काही दिवसांपूर्वीच हळदीच्या शेतात कोळपणी करताना बैलांच्या ऐवजी घरातील सदस्यांना जुंपलेल्या हिंगोली जिल्ह्यातील एका शेतकऱ्याचा व्हिडिओ समोर आला आणि त्याच्या दुसऱ्या दिवशी धनंजय मुंडे साहेबांची माणसं त्या शेतकऱ्याच्या दारात बैलांची जोडी घेऊन पोहोचले. हे राज्यात वेगवेगळ्या माध्यमांच्या बातम्यांमधून सर्वांनीच पाहिले! शेतकऱ्यांच्या प्रति इतकं संवेदनशील असणार हे नेतृत्व, शेतकऱ्यांच्या प्रगती आणि आर्थिक उन्नतीचे कायम ध्येय उराशी बाळगून काम करत असते. देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला त्याचबरोबरीने आता दाळी आणि अन्य कडधान्यांच्या बाबतीत सुद्धा देश शंभर टक्के स्वयंपूर्ण बनला आहे आणि यामध्ये मागील एक वर्षांमध्ये सर्वात मोठा वाटा महाराष्ट्राचा आहे हे सुद्धा मुंडे साहेबांच्या टीम मध्ये काम करणारा एक सहकारी म्हणून मला अभिमानाने सांगावे वाटते. आज चॅट जीपीटी, आर्टिफिशियल इंटेलिजन्स अशा आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नवनवीन तंत्रज्ञान अवलंबून देश जागतिक महासत्तेकडे वाटचाल करत असताना या देशातला शेतकरी सुद्धा बरोबरीने या प्रगतीच्या रथात बसला पाहिजे या दृष्टीने प्रत्येक निर्णय घेताना शेतीमध्ये सुद्धा आता ड्रोन ने फवारणी करावी, शेतात कोणतेही पिक घेण्या अगोदर त्या मातीचे परीक्षण केले जावे, त्याचबरोबर मातीचा असलेला पोत बघूनच त्याप्रमाणे कोणते पीक घ्यायचे हे ठरवले पाहिजे, यांसारख्या बारीक परंतु अत्यंत महत्त्वाच्या संशोधनाला धनंजय मुंडे हे कृषिमंत्री म्हणून प्राधान्य देत आहेत. अनेक जुन्या योजनांना नाविन्यपूर्ण रूप देऊन तसेच आणखी नव्या विविध योजना आखून त्या खऱ्या गरजू लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतील या दृष्टीने देखील बारकाईने नियोजन ते करतात. जगाच्या पाठीवर आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा वापर करून माती पासून ते सूर्यकिरणांपर्यंत विविध नैसर्गिक बाबींचा शेतीच्या उत्पादनात भर टाकण्यासाठी कसा वापर केला जाईल यासाठीचे विशेष संशोधन सुद्धा कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात राज्य शासनामार्फत हाती घेण्यात आले आहे. स्वतः जन्माने मराठवाड्यातील जरी असले तरी मराठवाडा जितका प्रिय आहे तितकाच विदर्भ तितकेच कोकण आणि तितकाच संपूर्ण महाराष्ट्र या पद्धतीने केवळ आणि केवळ आपल्या खात्याचा शेवटचा शेतकरी सुद्धा लाभार्थी ठरला पाहिजे या दृष्टीने काम करणारे धनंजय मुंडे हे शेतकऱ्यांच्या विकासाचे मंत्री नव्हे तर शेतकऱ्यांच्या विकासाचा मंत्र ठरतील आणि कृषी खात्याची सुद्धा आणखी प्रतिष्ठा वाढवली जाईल असा विश्वास मला आहे. शेतकऱ्यांच्यासाठी काम करत असताना कोणताही भेदभाव उराशी न बाळगता कायमच जे करायचे ते अगदी मनापासून अशी भूमिका ठेवून काम करणाऱ्या माझ्या साहेबांना जन्मदिनाच्या निमित्ताने खूप खूप शुभेच्छा!

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार....

सोमवार दि. १५ जुलै २०२४



## दत्तात्रय मुजमुले महाराष्ट्र प्राईड अवार्डने सन्मानित

**आष्टी । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर येथील संत एकनाथ रंग मंदिर येथे दिनांक ७ जुलै रोजी राज्यस्तरीय सुपर अबॅकस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यास्पर्धे दरम्यान अबॅकस क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जिजाऊ सुपर अबॅकस अकॅडमीचे संचालक दत्तात्रय मुजमुले यांना अबॅकस क्षेत्रातील मानाच्या महाराष्ट्र प्राईड अवार्डने सन्मानित करण्यात येते. महाराष्ट्रात सुपर अबॅकसचे जवळपास सर्वत्र सेंटर्स आहेत. त्यामध्ये अबॅकस क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या निवडक सेंटर्सना अबॅकस क्षेत्रातील मानाच्या महाराष्ट्र प्राईड अवार्ड दिला जातो .




# पंतप्रधान ग्राम सडक योजनेतून तब्बल सहा कोटी रुपये खर्चून तयार करण्यात येणाऱ्या पाटोदा ते जवळला फाटा रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे

## गुण नियत्रंण कक्षकडून तपासणी करूनच बील देण्याची मागणी

**पाटोदा । प्रतिनिधी**

पंतप्रधान ग्राम सडक योजनेतून तब्बल सहा कोटी रुपये खर्चून तयार करण्यात येणाऱ्या पाटोदा ते जवळला फाटा रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात येत असून या कामांची गुण नियत्रंण कक्षाकडून तपासणी करूनच कामाचे देयके अदा करण्यात यावीत अशी मागणी रियाज युसुफ सय्यद यांनी जिल्हाधिकारी आणि कार्यकारी अभियंता (प्रमंग्रासयो) यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था कार्यालयामार्फत चालु असलेल्या ५६१ जवळाला फाटा ते पाटोदा रस्ता भूमीअभिलेख कार्यालयापर्यंत होत असून, सदरील काम ५ किमी अंतरांचे असून या कामासाठी तब्बल सहा कोटींचा निधी उपलब्ध असून, म्हणजेच एका किमी साठी जवळपास सव्वा कोटी रुपये खर्च करण्यात येत आहे. मात्र अधिकारी व ठेकेदार यांच्या संगणमताने या रस्ता कामात मोठ्या प्रमाणात बोगस दस्ताऐवज तयार करून अंत्यत बोगस चालु असून सदरील कामाचे खोदकम न करता व मटेरीअल अंत्यत निकृष्ट दर्जाचे वापरले गेले आहे. सदरील कामावर देखरेख करत असलेले अभियंता व कार्यालयीन प्रमुख हे काम सुरु असतांना दिसुन आले नाही. सदरील काम बोगस दस्तऐवज तयर करुन केंद्र शासनाची दिशाभूल करण्याचे काम सुरु आहे. तसेच याबाबत वृत्तपत्रातून सदरील निकृष्ट कामाच्या बातम्या आलेल्या आहेत. तसेच लेखी निवेदने देऊनही याकडे दुर्लक्ष केले जात आहे. अधिकारी व ठेकेदार यांच्या संगणमताने मोठ्या प्रमाणात बोगस दस्ताऐवज तयार करून अजूनही बोगस काम चालू आहेत. त्यामुळे या बाबत सखोल चौकशी करून इन कॅमेरा चौकशी करून काम थांबविण्यात यावे व सदरील कामाचे बील सदरील एजन्सीला अदा करण्यात येऊ नये. सदरील बोगस कामाचे बिल दिल्यास आपल्या कार्यालयाविरोधात न्यायाययात याचिका दाखल करण्यात येईल असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

**पाटोदा तालुक्याला आमदारांकडून सापत्न वागणूक**

पाटोदा तालुक्यातील स्थानिक पातळीवर खंबीर नेतृत्व नसल्याने आष्टी तालुक्यातील नेत्यांवर इथल्या सर्व पक्षीय कार्यकर्त्यांना अवलंबून रहावे लागते. नेत्यांच्या सांगण्यावरून एकमेकाच्या पायात पाय घालणारी कार्यकर्ते असल्याने तालुक्याच्या विकासात अडथळा येत आहे. हे आमच्या कार्यकर्त्यांना का समजत नाही. आष्टीत सार्वजनिक कामांसाठी सर्व नेते पक्ष मतभेद बाजूला ठेवून एकत्र येतात आणि विकास कामे मार्गी लावतात. गेल्या काही दिवसात बाघितले तर राज्याच्या अर्थसंकल्पात आष्टी तालुक्यातील विकास कामासाठी कोटीच्या कोटी उड्डाणे घेणारे कामे मंजूर करून आणल्याचे महायुतीतील आजी माजी आमदार वृत्तपत्रांतून जाहिर सांगत आहेत पण यामध्ये एखाद दुसरे काम सोडले तर पाटोदा तालुक्यासाठी कुठलीच तरतूद झाल्याचे दिसत नाही. खुंटेफळ साठवण तलावाचे श्रेय आपल्यालाच मिळावे म्हणुन आजी माजी आमदार आपण कसे कसे प्रयत्न करत निधी उपलब्ध केल्याचा दावा करतात. हे निश्चित आशादायी आहे. आमचे ग्रामीण रुग्णालय महामार्गावर आहे. या रस्त्यावर अनेकदा मोठमोठे अपघात होतात यावेळी वेळेत उपचार मिळाले नाही म्हणून लोकांचें बळी जातात म्हणून ग्रामीण रुग्णालयाला ट्रॉमा केअर युनिट सुरू करण्याची आमची मागणी आधीची असताना आष्टीच्या वग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळतो हे असते लोकप्रतिनिधीचें काम. याचा धडा आम्ही पाटोदेकर कधी घेणार?

दुसरीकडे मात्र पाटोदा तालुक्यासाठी आलेल्या विकास कामाचा बट्ट्याबोळ होत असल्याची तक्रार झाली तरी सत्तेचा वापर करून तक्रारी दाबून टाकण्याचा प्रयत्न केला जातो. पण लोक कामांची तक्रारी का करतात याची दखल घ्यायला आजी माजी आमदारांना सवड नसते. याची अनेक उदाहरणे देता येतील. यामध्ये शहरातून जाणाऱ्या पैठण पंढरपूर पालखी मार्गाच्या कामाची अवस्था आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात असणाऱ्या मोठ्या पुलाची काय दुरावस्था झाली आहे. शहरात कोटीच्या कोटी रुपयांची कामे मंजूर होऊन येतात मात्र शहर वासियांना साधे स्वच्छ पाणी प्यायला मिळत नाही हे इथल्या लोकांचें दुर्दैव म्हणावे लागेल. अशा अनेक कामाची वाट कशी लागली हे बघूनही लोकं मात्र डोळेझाक करतात ते समजून घ्यावे लागेल.

आता सहा महिन्यांपूर्वी पंतप्रधान ग्राम सडक योजनेतून करण्यात येत असलेल्या रस्त्याचे कामाबाबत अनेकांनी कामाच्या दर्जाबाबत तक्रारी केल्या पण याची दखल ना प्रशासन घेते ना लोकप्रतिनिधी घेत नाहीत. अनेकदा आजी माजी आमदार या रस्त्यापासून जातात मात्र या रस्त्याचे काम कसे चालते हे पाहण्याची गरज वाटत नसल्याचे दिसून येते. फक्त मतासाठी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील कार्यकर्त्यांचा वापर घेण्यात येत असल्याचे दिसून येतो. त्यामुळे आता जनतेने याचा जाब निवडणुकीत या नेत्यांना विचारला पाहिजे . तरच तालुक्यातील विकास कामे चांगली होतील नाहीतर पुन्हा ये रे माझ्या मागल्या.. असे होत राहील.

## शहराचा विकास व्हावा अशी भावना नसणारी कार्यकर्ते आणि पदाधिकारी

दरम्यान पाटोदा ते जवळाला फाटा हा रस्ता पाटोदा शहर वासियासाठी अत्यंत महत्वाचा असून, जिल्हा मुख्यालयाला जोडणारा रस्ता आहे. त्यामूळे या रस्त्याचे काम अंदाजपत्रकानुसार दर्जेदार होणे गरजेचे आहे. यापूर्वी अनेकदा रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने रस्त्याची कायम दुरावस्था झालेली आहे. स्थानिक पातळीवर खंबीर नेतृत्व नसल्याने तालुका स्तरावर होणारी विकासकामे निवळ खाबुगिरीचे कुरण बनले आहेत. आपले गाव आहे आपल्या गावातील विकास काम चांगल्या दर्जाचे व्हावे अशी भावना काम करणाऱ्या कार्यकर्त्यांकडे, सत्ताधारी पक्षाच्या पदाधिकारी ना विरोधकाकडे ना स्थनिक गुत्तेदारांमध्ये होत कसे नाही हेच पाटोदा शहर वासियाचे दुर्दैव म्हणावे लागेल.

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेत महिलांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा -अॅड.कवठेकर

**बीड । प्रतिनिधी**

**लोकनेते माजी मंत्री सुरेश आण्णा धस साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली तेजस अॅर्बन च्या प्रतेक शाखेत मध्ये सुरू करून मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण वंचित राहून नये या साठी बालेपीर ,उखंडा ,वैद्यकिन्ही , डोंगरकिन्ही परीसरातील महीला साठी उदया सोमवार पासुन कॅम्प मध्ये**



सदरील सेवा देण्याचा उद्दिष्ट एकच आहे तो म्हणजे एकही महिला या योजनेपासून वंचित राहणार नाही वंचित राहणार नाही या दृष्टिकोन पुढे ठेवून जोपर्यंत प्परीसरातील या योजने पासून वंचित राहणार नाही तोपर्यंत सदरील कॅम्प चालू राहील याची सर्व मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या योजनेत समाविष्ट केल्याशिवाय सदरील कॅम्प बंद होणार नाही याची सर्व महिलांनी नोंद घ्यावी. सदरील कॅम्प हा दिनांक १५ / ७/२०२४ रोजी पासून फॉर्म भरण्यासाठी ची वेळ ११ते ५ दरम्यान आपण संपर्क कार्यालयाची या वेळेत संपर्क साधावा. ज्या महिलांना या योजनेचा लाभ घ्यायचा आहे. त्या महिलेचे २१ ते ६५ वयापर्यंत सहभागी अर्ज करू शकतात.सदरील अर्ज भरण्यासाठी आवश्यक असणारे कागदपत्राची पुढील प्रमाणे १) आधार कार्ड (२) आधिवास प्रमाणपत्र/जन्म प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला (टि.सी)/१५ वर्षा पूर्वीचे मतदान ओळखपत्र/१५ वर्षा पूर्वीचे रेशन कार्ड यापैकी कोणतेही एक ओळखपत्र(३) उत्पन्न प्रमाणपत्र/पिवळे किंवा केशरी रेशन कार्ड (४) बँक पासबुक (५) अर्जदाराचा फोटो

(६) महिलेचा जन्म परराज्य तील असल्यास पतीचे अधिवास प्रमाण पत्र/जन्म प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला/१५ वर्षा पूर्वीचे रेशन कार्ड/१५ वर्षा पूर्वीचे मतदान ओळख पत्र या पैकी कोणतीही एक ओळखपत्र संपर्कासाठी बालेपीर ९४२०६५५११२ उखंडा ९१४२९६८४०० , वैद्किन्ही ९९२३७५५११२ , डोंगरकिन्ही ९९२२७४५११२ या नंबर वरती संपर्क करावा असे अवाहन चेअरमन अॅड प्रकाश कवठेकर यांनी केले आहे

## उच्च शिक्षणाला नवीन संदर्भ प्रदान करणारे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -अधिष्ठाता डॉ. संजय साळुंके

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

''नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे उच्च शिक्षणाला नवीन संदर्भ प्रदान करणारे आहे,'' असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगरचे मानव्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजय साळुंके यांनी केले. ते डॉ. बा.आं. म. विद्यापीठ, संभाजीनगर आणि खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने ''नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी'' या विषयावर आयोजित एक दिवसीय कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खोलेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी हे उपस्थित होते तर मंचावर उद्घाटक म्हणून प्राचार्य डॉ. गोपाळराव काकडे, भा.शि. प्र. संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य तथा खोलेश्वर महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष श्री. राम कुलकर्णी आदी मान्यवरांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.




शुक्रवार दि.११ जुलै २०२४ रोजी खोलेश्वर महाविद्यालयात एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई, केज, धारूर, माजलगाव, परळी व वडवणी तालुक्यातील सर्व संलग्नित महाविद्यालयातील सर्व प्राचार्य, प्राध्यापक, एन.ई.पी. प्रमुख अपेक्षित होते. एकूण १६० जणांनी या कार्यशाळेत आपला सक्रिय सहभाग नोंदविला.

प्रारंभी प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यशाळेस सुरुवात झाली.

केंद्र शासन तथा महाराष्ट्र शासन आणि विद्यापीठाच्या विविध परिपत्रकांचा दाखला देत डॉ. संजय साळुंके पुढे बोलताना म्हणाले की नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व प्राध्यापक, प्राचार्य व संस्थाचालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने यावर्षी प्रथम वर्षाला प्रवेश देताना विद्यार्थ्यांनी घ्यावयाचे विषय, विद्यापीठाने बकेट मध्ये दिलेले विषय, कौशल्याधारित विषयांची निवड या अनुषंगाने मार्गदर्शन करताना प्राध्यापकांच्या येणाऱ्या कार्यभाराविषयीची समस्या, वेळापत्रकाविषयीची समस्या याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. नवीन शैक्षणिक धोरण हे विद्यार्थी केंद्रित असून विविध कौशल्यांना वाव देणारे व व्यवसायाभिमुख कौशल्याधारित विद्यार्थी निर्माण करणारे आहे, असे मत व्यक्त केले. यावेळी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांची त्यांनी उत्तरेही दिली. या नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने अंमलबजावणीसाठी निर्माण होणारे विविध प्रश्न सोडविण्यासाठी विद्यापीठाचा अधिष्ठाता म्हणून प्रयत्न करेल असे त्यांनी सांगितले.

यावेळी श्री. राम कुलकर्णी यांनी शुभेच्छापर मार्गदर्शन केले. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी ही काटेकोरपणे झाली पाहिजे त्यामुळेच भविष्यातील सशक्त भारत निर्माण होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले. प्रमुख उद्घाटक म्हणून उपस्थित असलेले प्राचार्य डॉ. गोपाळराव काकडे म्हणाले की नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीतील अडचणींकडे लक्ष न देता त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्वांनी एक पाऊल पुढे टाकले पाहिजे अशा भावना व्यक्त केल्या. अध्यक्षीय समारोप करताना खोलेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून काम केल्यास काहीही अवघड नसते. आपणास शिक्षण पद्धती सशक्त करायची आहे, विद्यार्थ्यांना अधिकाधिक स्वावलंबी बनविण्यासाठी कौशल्याधिष्ठित शिक्षण द्यायचे आहे. यासाठी आपण सर्वजण मिळून प्रयत्न करू. येणाऱ्या अडचणी विद्यापीठ व शासनाकडून सोडवून घेऊ असे विचार व्यक्त केले. या कार्यशाळेसाठी प्राचार्य डॉ. थारकर, प्राचार्य डॉ. दळवे यांच्यासह अनेक प्राध्यापकांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सतीश हिवरेकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. नितीन केंद्रे तर आभार निमंत्रक तथा उपप्राचार्य प्रा.डॉ. सुभाष पटेकर यांनी मानले.

पान ६ वरून...

## विकासाची दूरदृष्टी असणारा

सामान्यांसाठी झगडणं असो तुम्ही कायम लोकांना धीर दिला. जिथं नात्यातील लोकांनी साथ सोडली तिथं तुम्ही कुणाचा भाऊ झालात तर कुणाचा लेक बनून लोकांचे अश्रू पुसलेत. भाऊ... सत्ताकारण, राजकारण होत राहील पण तुम्ही जो तुमच्यातील माणूस जिवंत ठेवून मदत केली ती लोकांचे संसार उभे करणारी आहे. त्यामुळे तुमच्याबद्दल व्यक्ती म्हणून लिहिण हिमालयाच्या संदर्भात बोलण्यासारखं आहे.

नाथऱ्याच्या मुंडे कुटुंबात जन्म झाला. परंतु गोपीनाथरावजी मुंडे यांच्या घरा ऐवजी पंडीत अण्णा मुंडे यांच्या घरात जन्म झाला इथेच धनंजय मुंडे यांच्या खऱ्या संघर्षाची गाथा सुरू झाली. हे स्वतः धनंजय मुंडे साहेबांनी अनेकदा बोलून दाखवलेले आहे. स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचे नेतृत्व राज्यस्तरावर पोहचले त्यावेळी परळी मतदार संघातील जनतेशी संपर्क ठेवण्याची जबाबदारी स्वर्गीय पंडीत अण्णा आणि पुत्र धनंजय मुंडे यांच्याकडे आली होती. ही जबाबदारी सांभाळत असतानाच धनंजय मुंडे यांच्या राजकीय नेतृत्वाचा जिल्हा परिषेदेच्या माध्यमातून श्रीगणेशा झाला. आयुष्यातील पहिल्याच जिल्हापरिषदेच्या निवडणुकीत सुद्धा त्यांना मोठा संघर्ष करावा लागला होता. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद मिळण्याची अपेक्षा असतानाही त्यांचे पंख छाटण्यात आले. त्यानंतर पुढे धनंजय मुंडे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष झाले आणि जिल्हा परिषेदेच्या माध्यमातून धनंजय मुंडे यांनी आपले कर्तृत्व आणि नेतृत्व सिद्ध करत आपले नेतृत्व जिल्हाभर विस्तारले. जिल्ह्यातील प्रत्येक विधानसभा मतदार संघात त्यांचा संपर्क वाढला.

पुढे गोपीनाथरावजी मुंडे साहेबांनी लोकसभेच्या माध्यमातून २००९ ला राष्ट्रीय राजकारणात पदार्पण केले. आणि धनंजय मुंडे यांना परळी मतदारसंघातून विधानसभेवर जाण्याचा मार्गखुणावू लागला. परंतु ऐनवेळी अगदी शेवटच्या क्षणी पंकजाताई यांना परळी मतदार संघातून विधानसभेची उमेदवारी देण्यात आली. आणि धनंजय मुंडे यांचे विधानसभेत जाण्याचे स्वप्न भंगले. तरीही धनंजय मुंडे यांनी पंकजाताईंच्या खांद्याला - खांदा लावून त्यांना विजयी करण्यात सिंहाचा वाटा उचलला. पुढे गोपीनाथरावजी मुंडे साहेबांनी धनंजय मुंडे यांना विधान परिषदेवर संधी दिली. अखेर २०११ च्या नगर परिषदेच्या निवडणुकीच्या निमित्ताने मुंडे कुटुंबात उभी फुट पडली. आणि धनंजय मुंडे यांना २०११ नंतर मोठ्या आव्हानांना सामोरे जावे लागले. गोपीनाथरावजी मुंडे यांच्यापासून दूर झाल्यानंतर 'खलनायक' ठरलेल्या धनंजय मुंडे यांचे भवितव्य काय? असा प्रश्न सहाजिकच तेरा वर्षा पूर्वी निर्माण झाला होता. कुटुंबाच्या राजकीय वैभवानंतर पक्षांतराच्या निर्णयामुळे पुन्हा शुन्यातून सुरुवात करण्यासाठीचा संघर्ष काय असतो? याचा सामना करावा लागला. त्यावेळी गोपीनाथरावजी मुंडे यांच्या राजकीय प्रभावामुळे स्थानिक पातळीवर धनंजय मुंडे यांना एक - एक कार्यकर्ता जोडावा लागला.

धनंजय मुंडे यांना पुढे राष्ट्रवादीकडून विधान परिषदेत विरोधी पक्ष नेते पदाची संधी मिळाल्यानंतर सरकार विरुद्ध काम करताना चुलते गोपीनाथरावजी मुंडे यांच्या आक्रमकतेची आठवण करून देत नेतृत्वाची चुणूक महाराष्ट्राला दाखवलीआणि राज्यस्तरावर आपले नेतृत्व सिद्ध केले. आणि परळी मतदार संघातून आमदार होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी आपल्याकडे आलेला माणूस कोणत्या पक्षाचा आहे हे न पाहता प्रत्येकाला मदत केली. एक - एक माणूस जोडत अगदी रात्रीच्या बारा - एक, दोन अशा कुठल्याही वेळी अडचणीत असलेल्या व्यक्तीचा फोन स्वतः उचलून त्यांना मदत केल्याची हजारो उदाहरण आहेत. अनेक वेळा तर फक्त एका मॅसेजवर त्या व्यक्तीला स्वतः परत फोन करून त्यांच्या अडचणीच्या काळात मदत केल्याची उदाहरणे आहेत. सर्वसामान्य लोकांची काम करत आणि परिस्थितीशी संघर्ष करत २०१९ च्या विधानसभेच्या निवडणुकीत परळी मतदारसंघात देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी सभा घेतल्यानंतरही या विधानसभा निवडणुकीत तीस हजारांपेक्षा जास्त मताधिक्याने विजय मिळवला. मोठ्या राजकिय घडामोडीनंतर महाविकास आघाडीची सत्ता आली. आणि महाविकास आघाडीच्या मंत्रिमंडळात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री व पालकमंत्री पदाची संधी मिळाल्याने 'देव करतो ते भल्यासाठीच करतो' हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. आपण मोठे होत असताना मदत करणाऱ्यांना आणि समर्थ साथ देणाऱ्यांना मोठे करण्याची दानत त्यांच्या सक्षम नेतृत्वाची चुणूक दाखवते त्यामुळे गृहकलहानंतर 'खलनायक' ठरलेल्या धनंजयजी मुंडे यांच्या आयुष्याचा आजपर्यंतचा प्रवास हा ''उद्यमशील संघर्षयोद्धा'' म्हणून सिद्ध झाला आहे. शेवटी नियतीने आज मुंडे परिवारास पुन्हा एकत्र आणले आहे. घरातला जेष्ठ कर्ता पुरुष आणि एक भाऊ म्हणून आपण बहिणीसाठी काय करू शकतो हे नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत धनंजय मुंडे साहेबांनी दाखवून दिले आहे.

धनंजय मुंडे साहेबांची राजकीय कारकीर्द तशी सुरुवातीपासून संघर्षाचीच. तरीही त्यावर स्वकर्तुत्वाने मात करत मिळालेल्या प्रत्येक संधीचा उपयोग त्यांनी लोकांच्या भल्यासाठीच केला. विरोधी पक्षनेता असताना सर्वसामान्य जनतेचे प्रश्न त्यांनी अभ्यासपूर्ण सभागृहात मांडले आणि अनेक प्रश्नांवर सभागृहात समाजहिताचे निर्णय घ्यायला सरकारला भाग पाडले. सत्तेच्या काळात अगोदर सामाजिक न्यायमंत्री आणि आता कृषिमंत्री पदावर असताना त्यांचे काम उल्लेखनीयच आहे. आपल्या खात्याच्या माध्यमातून विविध योजनांचा लाभ तर त्यांनी गोरगरिबांपर्यंत पोहचविलाच परंतु त्याचबरोबर अनेक नवनवीन योजना अंमलात आणून लोककल्याणकाची एक अनोखी संकल्पना त्यांनी रुजविली आहे. देशाच्या कृषी मंत्रालयाने महाराष्ट्र राज्याने पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षा यांच्या माध्यमातून राज्याकडून घेतल्या गेलेल्या शाश्वत विकास धोरणांची दखल घेत, १५ व्या कृषी नेतृत्व समितीचा २०२४ चा प्रतिष्ठित सर्वोत्कृष्ट कृषी राज्य पुरस्कार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा पुरस्कार राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यासोबत स्वीकारला. केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान यांच्या हस्ते हा पुरस्कार नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आला. १५ व्या कृषी नेतृत्व समितीच्या-२०२४ कॉनक्लेव्हचे अॅग्रीकल्चर टुडे समूहाच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश आणि केरळचे राज्यपाल पी. सदाशिवम यांच्या अध्यक्षतेखाली १५ व्या कृषी नेतृत्व पुरस्कार समितीने राज्यातील पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षा आणि शाश्वत विकास धोरणांची दखल घेत महाराष्ट्राची सर्वोत्तम कृषी राज्य म्हणून निवड केली आहे. हा धनंजय मुंडे कृषिमंत्री आसलेल्या खात्याचा गौरव देशाने केला आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्याच्या राजकारणाबरोबरच विधिमंडळात अग्रभागी नेत्यांमध्ये धनंजय मुंडे साहेबांचे नाव घेतले जाते.

कट - कारस्थानांच्या राजकारणातून त्यांची प्रतिमा मलिन करण्याचा डाव विरोधकांकडून रचला गेला परंतू 'प्रत्येक विजयात संघर्ष, आणि प्रत्येक संघर्षात विजय' असा उद्यमशील प्रवास त्यांचा कायम राहिला असून जनसामान्यांचे असीम पाठबळ लाभल्याने त्यांना रोखणं कुणालाही शक्य झालं नाही. निवडणूक म्हटलं की, जय पराजय हा असतोच ; पण तरीही खचून न जाता त्यांनी जनसामान्यांचे प्रश्न अगदी तळमळीने आणि प्रामाणिकपणे सोडवण्याचे कार्य अविरतपणे सुरू ठेवले आहे. त्यामुळेच विकासाची दूरदृष्टी असणारा उद्यमशील संघर्षयोद्धा म्हणून अखंड महाराष्ट्र त्यांच्याकडे पहात असून धनंजय मुंडे या नावासमोर 'जननायक धनंजय मुंडे' ही उपाधी जनतेने त्यांच्या नावासमोर लावली आहे. कितीही यशाच्या उंच शिखरावर गेलं तरी आपली माणसं आणि माती यांच्याशी कायम नाळ ठेवत असल्याने प्रभू वैद्यनाथाच्या आशीर्वादाने आपली माणसं आणि मातीची सेवा करण्याची संधी आपणास वर्षभरापूर्वी महाराष्ट्र राज्याच्या कृषी मंत्री पदी झालेली निवड होय. साहेब, आपला जनसेवेचा अखंड यज्ञ असाच सुरू राहो आणि आपणास उदंड आयुष्य लाभो ह्याच आपणास वाढदिवसाच्या हार्दिक - हार्दिक शुभेच्छा!!!

अमोल तांदळे, ९४२००३२४३३

## केज विधानसभा मतदार संघातील

निविदा प्रक्रिया पार पडणार असून त्यानंतर लागलीच बांधकामाला सुरुवात होणार असल्याची माहिती आ. मुंदडा यांनी दिली. मतदार संघातील विकासकामांसाठी वाढीव निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, आ. पंकजाताई मुंडे, तत्कालीन खा. प्रीतमताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहे.

## सज्ञान नागरिकांनी मतदान

केंद्रीय निवडणूक आयोगाकडून दिनांक २५ जून ते २५ जुलै २०२४ दरम्यानच्या कालावधीत मतदान नाव नोंदणी कार्यक्रम जाहीर झालेला आहे तरी आपले नाव नोंदणीसाठी संपूर्ण नांव, संपूर्ण पत्ता, आधार कार्ड, मोबाईल नंबर सह जावुन आपले नाव नोंदणी करून घ्यावे याकरिता अठरा वर्षे पूर्ण झालेल्या तरुण-तरुणीनी आयोगाच्या hrrqt:/a2/ rotserr ebi gov.in या संकेतस्थळावर जावुन प्रत्यक्ष नाव नोंदणी करावी व आयोगास सहकार्य करावे असे आवाहन बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी केले आहे.

## जिल्ह्यातील महिलांनी 'मुख्यमंत्री

राबविण्यासाठी सर्व ठिकाणी आढावा घेऊन या विषयी मार्गदर्शन केले. यावेळी सर्व ठिकाणी ग्रामपंचायतचे सरपंच ग्रामसेवक अंगणवाडी पर्यवेक्षिका अंगणवाडी अंगणवाडी ताई बालविकास प्रकल्प अधिकारी संबंधित तालुक्याचे तहसीलदार उपविभागीय अधिकारी आष्टी मध्ये माजी आमदार सुरेश धस सर्व नगरपंचायत नगराध्यक्ष व संबंधित गावातील ग्रामस्थ उपस्थित होते. संबंधित योजना ही बीड जिल्ह्यामध्ये प्रभावीपणे राबविणेसाठी सर्वांनी सहकार्य करून ही योजना प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत पोहोचण्यात यावी, याबाबत माननीय जिल्हाधिकारी यांनी आव्हान केले व या योजनेमध्ये कुठलाही लाभार्थी वंचित राहणार नाही अशा प्रशासकीय सूचना संबंधित यंत्रणेला अशी पाठव यांनी यावेळी दिल्या.

## प्राचार्य नामदेव काळे यांचा मानूर येथे सेवापुर्ती सन्मान सोहळा संपन्न



**मानूर । प्रतिनिधी**

शाळा हे समाजाच्या ,भारत देशाच्या जडणघडणीचे संस्काराचे केंद्र आहे. या पवित्र क्षेत्रात जो इमान इतवारे देशसेवा करेल तोच खरा देशाचा शिल्पकार व आदर्श शिक्षक ठरू शकतो असे मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष डीजी तांदळे म्हणाले

प्राचार्य नामदेव काळे यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते .याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ष.ब्र. श्री १०८ गुरु विरूपाक्ष गुरुगिरी शिवाचार्य मानूरकर महाराज होते.

यावेळी शिरूर( का. पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी श्री जमीर शेख साहेब , दिव्य लोकप्रभाचे संपादक मानूर गावचे भूषण श्री संतोषजी मानूरकर साहेब ,मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस श्री राजकुमार कदम ,माजी जिल्हा परिषद सदस्य श्री दशरथ वनवे (दादा ) नागनाथ शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष ऍड वेलदे व्हि.डि, कार्याध्यक्ष मा. भांडकर व्ही .बी., खजिनदार मा .इजारे पी.बी. मानूर गावातील श्री कारभारी (मामा) कदम ,सरपंच अशोक (मामा) पाखरे, बीड विद्यमान जिल्हा परिषद सदस्या सविता रामदास बडे ,जि. प .प्रा .शाळा, मानूरचे मुख्याध्यापक आव्हाड सर ,स्वामी गणेशानंद निधी अर्बन बँक लि.मानूरचे अध्यक्ष श्री आजिनाथ आबा नागरगोजे, उपसरपंच सौ सविता अर्जुन बनसोडे, श्री भारत (आण्णा )पाखरे, उद्योगपती लिंबाशेठ (दादा) नागरगोजे ,श्री खलंदर (काका )पठाण, पत्रकार खलील पठाण ,माजी उपसरपंच यसरबभाई ,युवा नेते जयसिंग शिरसाठ ,बाळासाहेब क्षिरसागर विद्यार्थी, शिक्षकवृंद व काळे कुटुंबातील नागेश काळे ,सुहास काळे, पार्वतीबाई काळे, पिंपळगाव टप्पा, हिवरसिंगा तसेच मानूर परिसरातील सर्व शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक वृंद उपस्थित होते. यावेळी मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस मा .राजकुमार कदम म्हणाले की श्री नामदेव काळे हे सतत हसतमुख, उत्साही व कार्यरत असणारे व्यक्तिमत्व आहे, शिक्षक संघटनेमध्ये ,गुरुकुल पतसंस्थेमध्ये व शैक्षणिक क्षेत्रामध्ये त्यांचे अमोल योगदान आहे,

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
सोमवार दि.१५ जुलै २०२४
४

# जायकवाडी धरणाचा पाणीसाठा जैसे थे! पावसाची हुलकावणी, धरणसाठा वाढेना

राज्यभरात ठिकठिकाणी जोरदार पाऊस पडत असताना मराठवाड्यात मात्र अजून हलक्या ते मध्यम सरीच आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्याची तहान भागवणाऱ्या पैठणच्या जायकवाडी धरणातील पाणीसाठा अजून 'जैसे थे' च आहे. पावसाळा सुरू होऊन दीड महिन्याचा कालावधी लोटल्यानंतरही जायकवाडी धरणात आज केवळ ४.१ टक्के म्हणजेच केवळ ३ टीएमसी पाणीसाठा शिल्लक असल्याचे जलसंपदा विभागाने सांगितले.



जुलै महिन्यात पावसाची हुलकावणी : मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यात जुलै महिन्यात पावसाने हुलकावणी दिल्याचे चित्र आहे. जुलैच्या तुलनेत जायकवाडी धरण विभागात २०४ मिमी पाऊस झाला. मात्र जुलैच्या सुरुवातीपासून पावसाने दडी मारल्याने जायकवाडीच्या पाणीसाठ्यात फारशी वाढ झाली नसल्याचे दिसून येत आहे. जलसंपदा विभागाने नोंदवलेल्या पावसाच्या नोंदीनुसार , मागील वर्षी १ जून ते जुलै दरम्यान केवळ ६४ मिमी पावसाची नोंद झाली होती. ती यंदा २०४ मिमी एवढी झाली आहे. जुलै महिन्यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासह बहुतांश ठिकाणी पावसाने दडी मारल्याचे चित्र असून शेतकऱ्यांसह नागरिकांना भीषण पाणीटंचाईच्या झळा बसण्याची शक्यता आहे.

हजारो गावांची जायकवाडीवर मदार : मराठवाड्यातील सर्वाधिक २१७० दलघमी जलक्षमतेचे हे धरण असून या धरणावर छत्रपती संभाजीनगर सह मराठवाड्यातील हजारो गावांची तहान अवलंबून आहे. तसेच औष्णिक वीज प्रकल्प तसेच शेतीसाठीही या धरणाचा पाणीसाठा महत्त्वाचा ठरतो. १४ जुलै रोजी सकाळी ८ वाजता मोजण्यात आलेल्या पाणीपातळीनुसार जायकवाडी धरणात आज ८७.११ दलघमी पाणीसाठा ( ४.१% ) शिल्लक असून मागील वर्षी हा पाणीसाठा २७.१४% एवढा होता.

मराठवाड्यातील एकूण धरण साठा १०.६०% : राज्यभरातील धरणांमध्ये आता हळूहळू पाणी साठ्यात वाढ होत असताना मराठवाड्यातील लघु मध्यम व मोठी अशी एकूण ९२० धरणे मात्र अजून १०.६० टक्के एवढीच भरली आहेत. राज्यातील इतर पाच विभागांच्या तुलनेत मराठवाड्यातील पाणीसाठा सर्वात कमी असल्याचे जलसंपदा विभागाने दिलेल्या आकडेवारीतून दिसून येते.

छत्रपती संभाजीनगर विभागात ९० टक्के खरीप पेरण्या पूर्ण : कृषी विभागाने दिलेल्या आकडेवारीनुसार, छत्रपती संभाजीनगर विभागात ९० टक्के खरीप पेरण्या पूर्ण झाल्या असून पावसाच्या मोठ्या सरींची शेतकरी वाट पहात आहेत. मागील वर्षी पावसाच्या विस्कळीत स्वरूपाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. दरम्यान, हवामान विभागाने या वर्षी सरासरीहून अधिक पाऊस होणार असल्याचा अंदाज दिल्यानंतर शेतकऱ्याला चांगल्या पावसाची आशा आहे. हवामान विभागाकडून मराठवाड्यात पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला असला तरी अजूनही तुरळक भागात हलक्या सरीच येत असल्याचे सांगण्यात येत आहे.

## घोड्याच्या साहाय्याने डवरणी, हजारोंचा खर्च वाचविला!

सद्यस्थितीत शेतकरी डवरणीसाठी अनेक जुगाडू यंत्राचा वापर करतात. मात्र वाशीम जिल्ह्यातील एका शेतकऱ्याने चक्क घोड्याच्या साहाय्याने डवरणीचे काम केले आहे. त्याचा हा प्रयोग चांगलाच चर्चेत आहे.

वाशीम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यातील वसारी येथील अल्पभूधारक शेतकरी पंढरी वाघमारे यांनी बैलांद्वारे डवरणीकरिता एकरी ८०० ते १००० रुपये येत असलेला खर्च पाहता आपल्याकडे असलेल्या घोड्याद्वारे डवरणी करण्याचे ठरविले. कारण, अनेक जण विविध क्लृप्ती लढवून डवरणी करीत आहेत. या शेतकऱ्याने चक्क घोड्याद्वारे डवरणी केली. जमिनीचा पोत सुधारण्यासाठी व पिकांची चांगली वाढ होण्यासाठी शेतात डवरणी केली जाते. यासाठी डवरा हे उपकरण वापरले जाते. बैलाच्या साहाय्याने हे चालविले जाते. यासाठी बैल कुशल असावे लागतात तसेच चालविणारा अनुभवी असावा लागतो, अन्यथा कोवळ्या पिकांचे नुकसान होऊ शकते.

या शेतकऱ्याने एक वर्षापूर्वी घोड्याची खरेदी केली होती. शेत डवरणीसाठी घोड्याचा वापर होऊ शकतो व खर्चही वाचतो म्हणून त्यांनी हा प्रयोग करून पाहीला. घोड्याद्वारे त्यांनी ४ एकर शेती डवरणी करून ३२०० ते ४००० रुपयांची बचत केली आहे. त्यांनी केलेल्या या अफलातून प्रयोगाची परिसरात जोरदार चर्चाही रंगत आहे.

शेतीसाठी अनेक साधनांची आवश्यकता असते. यातही अनेक अवजारे ही महागडी असल्याने शेतकऱ्यांना परवडत नाहीत. यावर मात करत अनेक शेतकरी संबंधित शेतकामासाठी जुगाडू अवजारांची निर्मिती करत असतात. अशावेळी शेतकऱ्याने केलेला हा प्रयोग खरच कौतुकास्पद आहे.



## चांगली मागणी असणाऱ्या गुलाबी लसून लागवडीची माहिती

अवघ्या पाच महिन्याच्या कालावधीत येणाऱ्या गुलाबी लसणाला बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी आहे. परंतु मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी असल्यामुळे या लसणाचे भाव वाढत चालले आहेत. हायब्रीड लसणापेक्षा गावरान लसणाला ग्राहक पसंती दर्शवितात, परंतु हे मिळणे अवघड झाले आहे. शेतकऱ्यांनी या गुलाबी लसणाच्या लागवडीकडे एक अधिक उत्पन्न मिळवून देणारे पीक म्हणून बघणे गरजेचे आहे. कारण अवघ्या पाच महिन्यांच्या कालावधीत एका एकरमधून जवळपास तीन क्विंटल उत्पादन अपेक्षित असते. शहरी भागासह ग्रामीण भागातील भाजी मंडईमध्ये गुलाबी रंगाचा लसूण पहावयास मिळत नाही. मोठा व चांगल्या प्रतिचा लसूण मिळाला तरी त्याचा भाव ३५० रुपये असतो. हा लसूण काही मोजक्या शेतकऱ्यांकडेच उपलब्ध असल्याचे दिसून येत आहे. काही नागरिक या लसणाला गावरान असे सुद्धा म्हणतात. दरम्यान, आठवडी बाजारपेठेत भाजीपाला नेहमीच मिळतो. पाण्याच्या उपलब्धतेनुसार फळ भाज्यांचे भाव कमी जास्त होत असतात; परंतु हायब्रीड ऐवजी गुलाबी रंगाच्या लसणाला नेहमीच मागणी असते.



गुलाबी लसणाची शेती : हवामान – या पिकास समशितोष्ण हवामान उपयुक्त असते. मात्र अति उष्ण व अति थंड हवामान या पिकास मानवत नाही. पिकाच्या वाढीच्या काळात ७५ सेमीपेक्षा जास्त पाऊस पडत असल्यास पिकाची वाढ चांगली होत नाही. दिवसाचे २५ ते २८ अंश सेल्सिअस व रात्रीचे १० ते १५ अंश सेल्सिअस तापमानात गड्ढ्यांची चांगली वाढ होते. ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात केलेली लागवड अधिक उत्पादन देते. उशिरा लागवड केल्यास लसणाच्या कंदाचा आकार कमी होतो, वजन कमी भरते, परिणामी उत्पादनात घट होते. जमीन – मध्यम खोलीच्या भरपूर सेंद्रिय खते घातलेल्या रेती मिश्रित कसदार तणविरहित जमिनीत पीक चांगल्या प्रकारे घेता येते. हलक्या प्रकारच्या जमिनी, चिकण मातीच्या जमिनी लागवडीस योग्य नसतात. सुधारित जाती – महाराष्ट्रामध्ये फुले नीलिमा, फुले बसवंत, गोदावरी, भीमा पर्पल या जाती असून या सर्वांचा रंग गुलाबी किंवा जांभळा असतो. गोदावरी वाणाचा स्वाद अगदी तिखट असून राहुरी विद्यापीठाने हे वाण विकसित केले आहे. लागवडीसाठी सुधारित जातीचे बेणे वापरावे. आंतरपीक – लसूण पिकामध्ये वाफ्यांच्या वरंब्यावर कोबी, कोथिबीर किंवा मुळा इत्यादी कमी कालावधीच्या पिकांची लागवड करता येते. तसेच लसणाची आंतरपीक म्हणून ऊस, मिरची, फळबागांमध्येसुद्धा लागवड करता येते.

## ठिबक सिंचन संचाची काळजी व देखभाल

ठिबक सिंचन संच विकत घेण्यासाठी प्राथमिक स्वरूपाचा खर्च खूप आहे. ठिबक सिंचन संच जास्तीत जास्त काळ टिकावा असे शेतकऱ्यांना वाटणे साहजिक आहे. त्याकरिता शेतकऱ्यांनी ठिबक सिंचन संचाची योग्य ती काळजी व निगा वेळोवेळी घेणे गरजेचे आहे. कमी पाण्यात अधिक उत्पादन यासाठी सूक्ष्म सिंचनाचा भाजीपाला व फळ पिकात अवलंब केला जातो परंतु आता ऊसासारख्या पिकातही ठिबक सिंचनाचा वापर होताना दिसतो आहे. म्हणजेच ठिबक सिंचनाचा वापर वाढतो आहे. सूक्ष्म सिंचन पद्धतीत ठिबक सिंचन संचाची काळजी व देखभाल घेणे जरुरीचे आहे. ठिबक सिंचन संचाची कार्यक्षमता कायम राखण्यासाठी संचाची वेळोवेळी देखभाल करणे गरजेचे आहे. जेणेकरून वेळेची आणि उर्जेची बचत होते व संचाचे जीवनमान वाढते.



ठिबक सिंचन संच सुरू करण्यापूर्वी घ्यावयाची काळजी : १) ठिबक सिंचन संच बसविल्यानंतर प्रथम मुख्य व उपमुख्य लाईनचे फ्लश व्हॉल्व्ह उघडे करून जोडणीच्या वेळी पाइपलाइनमध्ये राहिलेला कचरा व माती काढून टाकावी. २) हा कचरा ड्रीपर मध्ये अडकू शकतो. स्वच्छ पाणी आल्यानंतर सर्व फ्लश व्हॉल्व्ह बंद करावेत. ३) फिल्टर चा बॅक फ्लश व्हॉल्व्ह बंद असल्याची खात्री करून घ्यावी. ४) बायपास आणि मुख्य कंट्रोल व्हॉल्व्ह उघडून पंप सुरु करावा. बायपास व्हॉल्व्ह हळूहळू बंद करत पूर्ण ठिबक संचामध्ये आवश्यक पुरेसा दाब निर्माण होईल, त्यावेळी तो स्थिर ठेवावे. ५) गाळण यंत्रातील दाबाचा फरक तपासून पाहून ठिबक संचाच्या शेवटच्या टोकास आवश्यक दाब आहे किंवा नाही याची खात्री करावी.

ठिबक सिंचन संच सुरू असताना घ्यावयाची काळजी : १) ठिबक सिंचन संचातील व्हॉल्व्ह, पाणी मापक व दाबमापक व्यवस्थित काम करतात किंवा नाही हे तपासणे. २) व्हॉल्व्ह दाबमापक व्यवस्थित काम करीत नसल्यास बदलावीत. ३) जाळीच्या गाळणी यंत्रात जाळी व्यवस्थित आहे की नाही ते पाहावे, जाळी फाटलेली असल्यास नवीन बसवावी. ४) तसेच रबर सील व्यवस्थित आहे की नाही पाहावे, गाळणी यंत्रात वाळू योग्य आहे की नाही ते पाहावे. ५) वाळू कमी असल्यास गाळणी यंत्रामध्ये वाळू टाकावी.

पंपाची देखभाल : १) पंपाच्या पुढे एक पाणी मोजण्याचे यंत्र (वॉटर मीटर) बसवावे. २) पाण्याचा प्रवाह किंवा पाण्याचा दाब आवश्यकतेपेक्षा कमी अधिक झाल्यास पंप तपासून त्याची कारणे शोधावीत व दुरुस्ती करावी. ३) दर दोन दिवसांनी पंपाचा आवाज, त्याचे तापमान, गळती तपासावी. ४) विद्युत मोटार, स्विचेस, मीटर व स्टार्टर यांची उत्पादकाने दिलेल्या मार्गदर्शनानुसार निगा ठेवावी.

मुख्य नळीची देखभाल : १) मुख्य नळी आठवड्यातून एक वेळा स्वच्छ करावी. २) मुख्य नळी शेवटच्या टोका जवळील फ्लॅश व्हॉल्व्ह उघडून जास्त दाबाने मुख्य नळी साफ करावी. ३) मुख्य नळीतून स्वच्छ पाणी येऊ लागल्यानंतर फ्लॅश व्हॉल्व्ह बंद करावा.

लॅटरलची देखभाल : १) लॅटरल आठवड्यातून एक वेळा स्वच्छ कराव्यात. २) लॅटरल स्वच्छ करण्याकरिता लॅटरल चे शेवटचे टोक उघडावे. ३) एका वेळी एकच लॅटरल स्वच्छ करावी, लॅटरलमधून स्वच्छ पाणी येऊ लागले म्हणजे लॅटरलचे शेवटचे टोक बंद करावे. ४) शेतामध्ये फिरून लॅटरलर्सचे निरीक्षण केले पाहिजे, लॅटरलमध्ये गळती आढळून आल्यास गुफ प्लगच्या साह्याने बंद करावी. ५) तण काढणे, कोळपणी करणे इत्यादी शेतातील कामे करतांना लॅटरलला इजा होणार नाही याची काळजी घ्यावी.

ड्रीपर्स ची देखभाल : १) ड्रिपर्समधून ठराविक प्रवाह गतीने झाडास पाणी मिळते की नाही यासाठी शेतामध्ये संचाचे वेळोवेळी निरीक्षण करावे. २) झाडाजवळील जमिनीचा भाग सारख्या प्रमाणात ओला झाला की नाही हे पाहावे. ३) ज्या झाडाजवळ जमिनीचा भाग कमी प्रमाणात ओला असेल त्या झाडाजवळ ड्रीपर्स उघडून पाहावे व स्वच्छ ठेवावे. ४) ड्रिपर्स चा प्रवाह दर ठराविक दाबावर अपेक्षित प्रवाह दरापेक्षा कमी आढळून आल्यास ड्रीपर्स उघडून स्वच्छ करावे. ५) ड्रीपर्स ची छिद्रे पाण्यातील जिवाणू सूक्ष्मजीव तंतू व शेवाळामुळे बंद पडू नये म्हणून ठिबक सिंचन संचास पंधरा दिवसांच्या किंवा महिन्याच्या अंतराने क्लोरीन प्रक्रिया द्यावी.

हंगाम संपल्यानंतर ठिबक संच बंद करताना : १) मुख्य नळी, उपनळी, लॅटरलर्स स्वच्छ कराव्यात. २) गाळणी यंत्र स्वच्छ पाण्याने साफ करावे, वाळूचे गाळणी यंत्र उघडून त्यातील वाळू सुकू द्यावी. ३) संचा सोबत खते देण्याची टाकी असल्यास ती स्वच्छ करावी. ४) ठिबक सिंचन संच वापरात नसताना लॅटरलर्स काढून ठेवायच्या असल्यास यांचा गोल गुंडाळी करून सुरक्षित ठिकाणी ठेवावी. ५) ठिबक सिंचन संच बंद असताना नादुरुस्ती असलेले घटक उदा. नळ्या, व्हॉल्व्ह इ. दुरुस्त करायला ठिबक सिंचन संचास बंद करण्यापूर्वी आम्ल व क्लोरिन प्रक्रिया देणे अधिक चांगले असते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६२ : इंग्लंडमधे प्रतिष्ठित असलेल्या 'रॉयल सोसायटी'ची स्थापना
१६७४ : मुघल सरदार बहादुरशाह कोकलताश याच्या ताब्यात असलेल्या पेडगावची मराठ्यांनी लूट केली. सुमारे १ कोटिची लूट रायगडावर जमा झाली.
१९१६ : जगभरात विमान, रोटरक्राफ्ट, रॉकेट, उपग्रह, दूरसंचार उपकरणे आणि क्षेपणास्त्रांची रचना आणि विक्री करणारी अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपनी बोईंग ची स्थापना करण्यात आली.
१९२६ : मुंबईत कुलाबा ते क्रॉफर्ड मार्केट अशी उपनगरी बस सेवा सुरू झाली.
१९२७ : समाजाला कुटुंबनियोजन आणि लैंगिक समस्यांसंबधी मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने र. धों. कर्वे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सुरु केलेल्या 'समाजस्वास्थ्य' या मासिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला.
१९५५ : आण्विक अस्त्रांवर बंदी घालणाऱ्या मैनाउ जाहीरनाम्यावर १८ नोबेल पारितोषिक विजेत्या शास्त्रज्ञांनी स्वाक्षऱ्या केल्या. नंतर आणखी ३८ नोबेल पारितोषिक विजेत्यांनी त्याला मान्यता दिली.
१९५५ : पंडित जवाहरलाल नेहरू यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर
१९६२ : शिक्षणक्षेत्रातील महत्त्वपूर्ण व यशस्वी प्रयोग मानल्या जाणार्या 'ज्ञानप्रबोधिनी' या संस्थेचा पुणे येथे प्रारंभ
१९७९ : भारताचे तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.
१९९६ : स्वाध्याय परिवाराचे प्रणेते पांडुरंगशास्त्री आठवले यांना रॅमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर
१९९७ : पर्यावरणवादी कार्यकर्ते महेशचंद्र मेहता यांची रॅमन मॅगसेसे पुरस्कारासाठी निवड
२००६ : ट्विटर हा सर्वात मोठा सोशिअल प्लॅटफॉर्म सुरु झाला.
२०११ : भारतीय अंतराळ संस्था इस्रो ने आपल्या ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपण वाहन पीएसएलव्हीद्वारे आधुनिक संप्रेषण उपग्रह जीसॅट-१२ अंतराळ कक्षेत यशस्वीरित्या स्थापित केला.
२०१४ : जागतिक युवा कौशल्य दिन

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६०६ : रेंब्राँ डच चित्रकार (मृत्यू: ४ आक्टोबर १६६९)
१६११ : मिर्झा राजे जयसिंग (मृत्यू: २८ ऑगस्ट १६६७)
१७८३ : पर्शियन भारतीय व्यापारी व दानवीर जमशेदजी जीजाभाई यांचा जन्मदिन.
१८४० : स्कॉटिश इतिहासकार, सांखिकीतज्ञ, संकलक आणि भारतीय नागरी सेवेचा सदस्य विलियम विलसन हन्टर यांचा जन्मदिन.
१९०३ : के. कामराज स्वातंत्र्यसैनिक, खासदार व तामिळनाडुचे मुख्यमंत्री (मृत्यू: २ आक्टोबर १९७५)
१९०४ : गानतपस्विनी मोगुबाई कुर्डीकर जयपूर अत्रौली घराण्याच्या शास्त्रीय गायिका (मृत्यू: १० फेब्रुवारी २००१)
१९०५ : चौधरी मुहम्मद अली पाकिस्तानचे ४ थे पंतप्रधान (मृत्यू: २ डिसेंबर १९८०)
१९०९ : भारतीय स्वतंत्रता सेनानी, मुत्सदी, वकील व आंध्रप्रदेश राज्याच्या पहिल्या महिला राजनेता दुर्गाबाई देशमुख यांचा जन्मदिन.
१९१७ : नूर मोहम्मद तराकी अफगणिस्तानचे तिसरे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: १४ सप्टेंबर १९७९)
१९२७ : प्रा. शिवाजीराव भोसले विचारवंत, वक्ते व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू (मृत्यू: २९ जून २०१०)
१९३० : नोबल पारितोषिक विजेता अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ लिओन एम. लेडर मैन यांचा जन्मदिन.
१९३२ : नरहर कुरुंदकर विद्वान, टीकाकार आणि लेखक (मृत्यू: १० फेब्रुवारी १९८२)
१९३३ : भारतीय लेखक आणि पटकथालेखक एम. टी. वासुदेवन नायर यांचा जन्म.
१९३६ : भारतीय हिंदी पत्रकारिता, लेखक आणि राजकीय विश्लेषक प्रभास जोशी यांचा जन्मदिन.
१९३७ : भारतीय पत्रकार श्री प्रभाज जोशी यांचा जन्म. (मृत्यू: ५ नोव्हेंबर २००९)
१९४९ : माधव कोंडविलकर दलित साहित्यिक

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२९१ : रुडॉल्फ (पहिला) जर्मनीचा राजा (जन्म: १ मे १२१८)
१५४२ : लिओनार्डो दा विंची यांच्या पेंटिंग मोना लिसा मधील महिला लिसा डेल जिकॉन्डो यांचे निधन. (जन्म: १५ जून १४७९)
१९०४ : अंतॉन चेकॉव्ह रशियन कथाकार व नाटककार. याने मॉस्को विद्यापीठातून वैद्यकीय पदवी घेतली होती मात्र वैद्यकीय व्यवसाय कधी केला नाही. (जन्म: २९ जानेवारी १८६०)
१९१९ : एमिल फिशर रासायनिक प्रक्रियेद्वारे शर्करा रेणूंच्या निर्मितीसाठी १९०२ मध्ये नोबेल पुरस्कार मिळालेले जर्मन रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ९ आक्टोबर १८५२)
१९५३ : ऑर्डर ऑफ दी इमिटेशन ऑफ क्राइस्ट चे संस्थापक भारतीय आर्चबिशप गिवरगीस मार इव्हानिओस यांचे निधन. (जन्म: २१ सप्टेंबर १८८२)
१९६७ : नारायण श्रीपाद राजहंस तथा 'बालगंधर्व' गायक व नट (जन्म: २६ जून १८८८)
१९७९ : मेक्सिकोचे राष्ट्राध्यक्ष गुस्तावोदियाझ ओर्दाझ यांचे निधन.
१९९१ : जगन्नाथराव जोशी जनसंघ व भाजपचे नेते, गोवा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक, संसदपटू, वक्ते (जन्म: ? ? १९२०)
१९९८ : ताराचंद परमार गांधीवादी कार्यकर्ते व स्वातंत्र्यसैनिक
१९९९ : इंदुताई टिळक सामाजिक कार्यकर्त्या
१९९९ : जगदीश गोडबोले पर्यावरणवादी लेखक व सामाजिक कार्यकर्ते
२००४ : डॉ. बानू कोयाजी कुटुंबनियोजनाच्या क्षेत्रात सलग साठ वर्षे कार्य करणार्या सामाजिक कार्यकर्त्या. त्यांना पद्मभूषण, रॅमन मॅगसेसे पुरस्कार, रामेश्वरदास बिर्ला राष्ट्रीय पुरस्कार, पुण्यभूषण पुरस्कार, पुणे विद्यापीठातर्फे डॉक्टर ऑफ लेटर्स (१९५५) इ. पुरस्कारांनी गौरविण्यात आले. पुण्यातील के. इ. एम. रुग्णालय, जहांगीर नर्सिंग होम, दैनिक सकाळ, इंडिया फाउंडेशन इ.संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. (जन्म: २२ ऑगस्ट १९१८)

# भाई आकाश निर्मळ यांचे उपोषण मागे

## खा. बजरंग सोनवणे यांनी लोकसभेत धनगर, वडार एसटी आरक्षणाचा मुद्दा उपस्थित करण्याचा दिला शब्द




बीड । प्रतिनिधी

२९ जून पासून १४ जुलै पर्यंत धनगरांना वडर समाजाला आरक्षण एसटी प्रवर्गातून मिळावे म्हणून भाई आकाश निर्मळ उपोषणाला बसले होते. या प्रवर्गाला एसटीतून आरक्षण मिळावे यासाठी अनेक आंदोलने झाली आहे लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांनी पंढरपूरला अटल बिहारी वाजपेयी यांना आणून धनगरांचा प्रचंड मेळावा घेतला होता. २०१४ ला बारामतीला धनगरांचा ऐतिहासिक मोर्चा सर्व धनगर संघटनांनी काढला होता. स्वतः देवेंद्रजी या मोर्चाला हजर होते. भाजपाची सत्ता आली तर दुसऱ्या दिवशी आरक्षण देऊ असेही ते म्हणाले होते परंतु प्रत्यक्षात मात्र या मागणीला कचऱ्याची टोपली दाखवण्यात आली. त्यानंतर अनेक धनगर संघटना कोर्टात लढत होत्या त्या सर्व याचिका एकत्र करून मे महिन्यात सुनावणी झाली कोर्टाने या सर्व याचिका निकाली काढल्या परंतु धनगर हा कायम भटकंती करणारा डोंगर दर्या खोऱ्यात राहणारा ऊस तोडणी मजुरीचे काम करणारा समाज आहे त्यामुळे आपण एसटी प्रवर्गात गेलो तर फायदा होईल म्हणून त्यांचे अनेक नेते ही मागणी करीत असतात.

चौंडीला बालासाहेब दोडतले यांच्या नेतृत्वात धनगरांच्या दोन तरुणांनी प्रानांतिक उपोषण केले. महाराष्ट्र सरकारने दखल घेऊन थातुरमातूर आश्वासन देऊन उपोषण स्थगित केले. भाई आकाश निर्मळ बीड तालुक्यातील शिदोड गावचे रहिवासी शेकापाच्या मध्यवर्ती समितीचे सदस्य आहेत त्यांनी पंधरा दिवस नेटाने संघर्ष केला परंतु प्रशासन व शासन दोघांनीही या त्यांच्या आंदोलनाकडे पाठ फिरवली शेवटी प्रा. सुशीला मोराळे आणि माजी आ. बदामराव पंडित यांच्या मध्यस्थीने खा. बजरंग सोनवणे यांच्या हस्ते हे उपोषण सोडण्यात आले. देशाच्या सभागृहात हा प्रश्न मी लावून धरीन असा शब्द त्यांनी भाई निर्मळ यांना दिला आहे. याप्रसंगी प्रा. पंडित तुपे, जाधव, स्वप्निल गलधर, कॉ.भाऊ प्रभाळे, भाई दत्ता प्रभाळे, प्रा. माने, बबनराव आंधळे, संतोष काळे, मोहना आघाव, दत्तात्रय कानडे, सर्जेराव मस्के, अतिश मोराळे, बालासाहेब नेहरकर, तुकाराम बारगजे अल्ताफ शेख, रिजवान पठाण, सचिदानंद घुगे, उद्धव सानप, बाबासाहेब आरकडे, बापू केदार, सतीश बांगर, मनोज गायकवाड, सतीश कुलकर्णी, दत्तात्रय कानडे, शंकर विटकर, संजय लकडे, अमर वाघमोडे, कचरू चांभारे, प्रा.भगवान माने,बाबासाहेब लंबाटे, बाबुलाल ढोरमारे,जालिंदर गाडेकर, काकासाहेब कानडे,डॉ. राजेंद्र बंड, भाई राजेद्र नवले,मुकेश गाडेकरसह आदींची उपस्थिती होती.

## प्लास्टिक मुक्त शहर करण्यासाठी सर्वांचा पुढाकार महत्वपूर्ण-प्रियंका टोंगे




अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहर प्लास्टिक मुक्त करण्यासाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे. सर्वांच्या सहकार्याने ही चळवळ गतिमान होईल. असे प्रतिपादन नगर परिषदेच्या मुख्याधिकारी प्रियंका टोंगे यांनी केले. रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व नगर परिषदेच्या वतीने जागतीक वर्ल्ड पेपर बॅग डे निमित्ताने शुक्रवारी भरणाऱ्या आठवडी बाजारात दोन हजार कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मुख्याधिकारी प्रियंका टोंगे बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर रोटरीचे अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोलंकी, प्रकल्प संचालक विजयसिंह,ठाकूर, सह संचालक गोरख मुंडे, यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना प्रियंका यांनी प्लास्टिक वापराचे दुष्परिणाम सांगितले.पर्यावरणासाठी घातक असणारे प्लास्टिक निसर्गा समोर अनेक अडचणी करीत असल्याचे त्यांनी सांगितले.यासाठी जनजागृती अभियान राबवून ही मोहीम गतिमान करण्यासाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे. असे त्या म्हणाल्या. अध्यक्षीय समारोप कल्याण काळे यांनी केला. यावेळी नगर परिषद हद्दीतील आठवडी बाजारा मध्ये व्यापारी व नागरिकांमध्ये प्लास्टिकचा पर्यावरणावर होणारा परिणाम, बंदी असलेले प्लास्टिक वापराबाबत दंडात्मक कारवाई इ बाबत जनजागृती करण्यात आली. तसेच दुकानदार, विक्रेते, नागरिकां कडुन प्लास्टिक पिशवी जमा केल्या. व कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. प्लास्टिकचा वापर टाळा व पर्यावरणाचा ह्रास टाळा. अश्या घोषणा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे संचालन विजयसिंह ठाकूर यांनी केले,प्रास्ताविक.धनराज सोळंकी यांनी तर उपस्थितांचे आभार शकील शेख यांनी मानले. या वेळी नगर परिषद अंबाजोगाई कर्मचारी स्वच्छता निरीक्षक रमाकांत सोनकांबळे, शहर समन्वयक लखन ओव्हाळ. रोटरी चे राजेंद्र घोडके. डॉ निशिकांत पाचेगावकर, डॉ सुरेश अरसुडे, स्वरूपा कुलकर्णी, रलओमकेश दहीफळे, शकील शेख, सुहास काटे, बाबुराव बाभुळगावकर, अंगद कराड यांची उपस्थिती होती

# धर्मेवाडी येथील शेतकऱ्यांना कापूस कीड रोग व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन




माजलगाव । प्रतिनिधी

या वर्षी मान्सूनपूर्वीच एक दोन दिवस अगोदर मान्सून पूर्व जोरदार पाऊस झाला होता आणि लगेच दोन दिवसांनी मान्सूनचे आगमन झाले त्यामुळे शेतकऱ्यांनी लवकरच खरिपाच्या पेरण्या केल्या होत्या बीड जिल्ह्यात कापूस हे खरिपातील मुख्य पीक आहे आणि पाऊस लवकर पडल्याने या वर्षी कापसाचा पेरा वाढला आहे कापूस लागवड होऊन जवळ जवळ एक महिना झाला आहे.या एका महिन्यात कापसाची चांगली वाढ झालेली आहे.आणि या वर्षी कापसावर कीडीचे प्रमाण कमी आहे.त्यामुळे शेतकरी बांधवांना कापसावर पहिली फवारणी कोणती करावी असा प्रश्न पडला आहे,तेव्हा शेतकऱ्यांना कापसमधील कीड ओळखता यावा यासाठी रिलायन्स फाउंडेशन कडून धर्मेवाडी येथे दि १४ जुलै रविवार रोजी शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यक्रमाला मुख्य मार्गदर्शक म्हणून कृषी विभाग आत्मा माजलगाव येथील बी.टी.एम.गोपीनाथ पवार यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी असे सांगितले की सुरुवातीची फवारणी निंबोळी अर्काची करावी जेणेकरून कापूस पिकातील कीड ही नियंत्रित राहील तसेच सुरुवातीलाच जर तुम्ही जास्त क्षमतेचे कीटक नाशक कापसावर फवारले तर किडींची ते औषध पचविण्याची क्षमता वाढते व नंतरच्या फवारणीचा उपयोग म्हणावं तसा होत नाही त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या पिकातील किडी नुसार कीटक नाशक फवारावे सुरुवातीला किडीचे प्रमाण कमी असते त्यामुळे टप्पा टप्पाने कीटक नाशकाची क्षमता वाढवावी तसेच कापसामध्ये निळे पिवळे चिकट सापळे लावावेत जेणे करून किडीचे नियंत्रण कमी पैशांमध्ये होईल या कार्यक्रमाला गावातील शेतकरी गोपीचंद विर,भागवत हुंबे,अशोक मुठाळ, माहदेव काळे तसेच इतर गावकरी मंडळी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आयोजन रिलायन्स फाउंडेशनचे जिल्हा प्रतिनिधी विजय खंडागळे व जिल्हा व्यवस्थापक तज्ोदीन काझी यांनी केले होते.या कार्यक्रमाला आत्माचे शिरीष घनघाव व विश्ववलभ शेतकरी उत्पादक कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री गणेश लगड आणि संचालक नवनाथ यादव हे उपस्थित होते.

# शिवसेना कार्यालयात लाडकी बहीण योजना नोंदणीला प्रारंभ

## बीडमधील महिला भगिनींनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा-जगताप



बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक लोकप्रिय बनलेली 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' या अभियानाचा शुभारंभ कार्यक्रम शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन भैय्या मुळूक यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आज दि. १४ जुलै रोजी सकाळी ११.०० वाजता शिवसेना मध्यवर्ती कार्यलय जालना रोड बीड येथे पार पडला. आजपासून दररोज सकाळी १०.०० ते सायं ६.०० वाजेपर्यंत शिवसेना मध्यवर्ती कार्यलय जालना रोड बीड येथे महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना नोंदणी फॉर्म मोफत भरता येणार आहे. या योजनेपासून बीडमधील महिला वंचित राहू नयेत आणि बीडमधून जास्तीसजास्त महिलांना या योजनेचा लाभ घेता व नोंदणी फॉर्म भरताना महिलांची कुठलीही गैरसोय होऊ नये यासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन भैय्या मुळूक यांनी जालना रोड येथील आपल्या स्वतःच्या शिवसेना मध्यवर्ती कार्यलयात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना नोंदणी सेंटरची स्थापना केली आहे. या शुभारंभ कार्यक्रमासाठी बीडमधील महिला भगिनींची मोठ्या संख्येत उपस्थिती होती. याबरोबरच शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, पदाधिकारी तथा लोकप्रतिनिधी या शुभारंभ कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

### अर्ज भरण्यासाठी आवश्यक असणारे कागदपत्र

१) आधार कार्ड (२) आधिवास प्रमाणपत्र/जन्म प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला (टि.सी)/१५ वर्षा पूर्वीचे मतदान ओळखपत्र/१५ वर्षा पूर्वीचे रेशन कार्ड यापैकी कोणतेही एक ओळखपत्र(३) उत्पन्न प्रमाणपत्र/पिवळे किंवा केशरी रेशन कार्ड (४) बँक पासबुक (५) अर्जदाराचा फोटो (६) महिलेचा जन्म परराज्य तील असल्यास पतीचे अधिवास प्रमाण पत्र/जन्म प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला/१५ वर्षा पूर्वीचे रेशन कार्ड/१५ वर्षा पूर्वीचे मतदान ओळख पत्र या पैकी कोणतीही एक ओळखपत्र असणे अनिवार्य आहे.

## महसुल कर्मचारी संघटनेचा बेमुदत संप ; सहभागी होण्याचे अवाहण

धारूर । प्रतिनिधी

राज्यातील महसुल कर्मचा-याचे विवीध महत्वपुर्ण मागण्या साठी १५ जुलै पासून महसुल कर्मचारी संघटनेने बेमूदत संप पुकारला असून सर्व कर्मचा-यानी या संपात सहभागी होऊन संप यशस्वी करावा असे अवाहण महसुल कर्मचारी संघटनेचे प्रकाश गोपड यांनी केले आहे.

राज्यातील महसुल करमचा-याचे विवीध प्रश्ना वर महसूल कर्मचारी संघटनासातत्याने शासना कडे पाठपुरावा करत असताना वेळोवेळी आंदोलन करूनही प्रशासन लक्ष देत नसल्याने महसूल कर्मचाऱ्यांची महत्वपूर्ण मागणी जुनी पेन्शनची आहे. तसेच महसूलचा सुधारित आकृतिबंध लागू करण्यात यावा. राज्यातील महसूल विभागात अव्वल कारकून-मंडळाधिकारी संवर्गातून नायब तहसीलदार या पदावर पदोन्नती आदेश निर्गमित करावे. महसूलसाठी एक परीक्षा पद्धती लागू करताना महसूल सहायकांचा ग्रेड-पे २४०० रुपये करावा आदी मागण्या साठी १५ जुलै पासून महसुल कर्मचारी संघटनेने बेमूदत संप पुकारला असून या सप़ात कर्मचा-यानी सहभागी होऊन संप यशस्वी करावा असे अवाहन महसुल कर्मचारी संघटनेचे नेते प्रकाश गोपड यांनी केले आहे

# माजी आ.भिमराव धोंडे यांचा गहिनीनाथ गडाच्या दिंडीत सहभाग

आष्टी

विठ्ठल नामाचा गजर करीत गहिनीनाथ गडाचा पालखी सोहळा पंढरीकडे मार्गस्थ होत आहे.करमाळा तालुक्यातील वरकुटे येथून आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार भीमराव धोंडे शनिवारी पायी दिंडी सोहळ्यात सहभागी झाले,हातात टाळ,डोक्यावर टोपी परिधान करीत पाच किलोमीटर अंतर दिडींत वारकऱ्यासोबत चालत पाच तास दिंडीचा आनंद घेतला. ओम चैतन्य श्री गहिनीनाथ महाराज व प्रात स्मरणीय श्री संत वामनभाऊ महाराज पादुका पालखी सोहळ्याचे श्री क्षेत्र गहिनीनाथ गड ते श्री क्षेत्र पंढरपुरकडे ६ जुलै रोजी प्रस्थान झाले.



भगव्या पताका हातात घेऊन विठ्ठल नामाचा गजर करीत पालखी पंढरीकडे मार्गस्थ होत आहे.मराठवाड्यातील सर्वात मोठा समजला जाणारा श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाच्या पायी दिंडी सोहळा वाहली,सावरगाव, वनवेवाडी, मातकुळी मैदान, जामखेड, सारोळा, खुरदैठण, घोडेगाव, आपटी, पिंपळगाव उंडा, चिंचपुर, तांदळवाडी, देऊळगाव, मिरगव्हाण, सालसे, वरकुटे, भोगेवाडी, पिंपळखुंटे, अंबड, बार्डी, जाधववाडी, पवार वस्ती पाटा, मेंढापुर पाटील वाडा मार्गे पंढरपूर कडे जात आहे. दिंडीत प्रचंड संख्येने वारकरी सहभागी झाले आहेत.३५० ते ४०० चारचाकी वाहनांचा ताफा दिंडी सोबत दिमतीला आहे.मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यातील गाव, वाडी, वस्त्यामधून हजारो वारकरी राष्ट्रसंत वामन भाऊंचे दिंडीत सहभागी झाले आहेत.संत वामन भाऊ महाराज यांनी या पालखीची सुरुवात सुमारे १३१ वर्षापूर्वी केली होती.आजही हि परंपरा सुरु आहे. बीड, अहमदनगर, संभाजीनगर व मराठवाड्याच्या इतर जिल्ह्यातील वारकरी सहभागी होतात. शिस्तबद्ध आणि सर्व समावेशक असलेल्या दिंडीचे नियोजन या गडाचे महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली केले जाते.

काही वृद्ध वारकरी चालुन थकल्यावर त्यांना बसण्यासाठी चारचाकी वाहनांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे तसेच वारकरी आजारी पडल्यास त्यांना वैद्यकीय सेवा पुरविण्याची सोय देखील आहे.रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी वारकरी महिला फुगडी तर पुरुषांनी कुस्ती व कबड्डी खेळत वारीचा आनंद घेतला. माजी आमदार भीमराव धोंडे हे जवळपास पाच तास गहिनीनाथ गडाचे महंत विठ्ठल महाराज शास्त्री व वारकऱ्यांच्या सोबत होते.तसेच रिंगण सोहळ्याचा आनंद त्यांनी घेतला.

पालखी सोहळ्याचे दर्शन घेत आठरे येथे झालेल्या अश्वांच्या रिंगण सोहळ्यात माजी आमदार भीमराव धोंडे यांनी वारकऱ्यांच्या सोबत फुगडी खेळण्याचा आनंद घेतला.सोमवारी दिनांक १५ जुलै रोजी माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वतीने गहिनीनाथ गडाच्या दिंडीतील लाखो वारकऱ्यांसाठी महापंगत देणार आहेत महापंगतीच्या प्रसादाचा वारकऱ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले आहे.

# तेराशे मतदारांसाठी एक मतदान केंद्र असेल -जिल्हाधिकारी

## मतदान प्रक्रिया सुलभ होण्यासाठी मतदान केंद्रांची संख्या वाढवा-राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीतील अनुभव लक्षात घेता आगामी सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीसाठी मतदान प्रकिया गतिमान व सुलभपणे पार पाडावी. प्रत्येक मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा. मतदारांचा वेळ वाया न जाता त्यांनी उत्साहाने मतदानास यावे. मतदान केंद्रावरील रांगा आणि गर्दी कमी व्हावी. एका गावाहून दुसर्या गावात मतदानास जाण्या ऐवजी मतदारांच्या गावात मतदान केंद्र दिले पाहिजे. भौगोलिक व मतदारांची मागणी लक्षात घ्यावी. अशा सूचना देऊन, मतदारांची गैरसोय टाळण्यासाठी जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदान क्षेत्रात मतदान केंद्रांची संख्या वाढवावी. अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्याकडे केली आहे.



आगामी विधानसभा लक्षात घेऊन, मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनर्निरीक्षण कार्यक्रमा अंतर्गत जिल्हाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्व राजकीय पक्षांच्या जिल्हाध्यक्ष तथा प्रतिनिधींची बैठक संपन्न झाली. दिनांक ०१/०७/२०२४ या अहर्ता दिनांकावर आधारित मतदार याद्यांचा दुसरा विशेस संक्षिप्त पुनर्निरीक्षण कार्यक्रम चालू असून, मतदार यादी अद्ययावत करण्याचे काम जिल्हा प्रशासनाकडून चालू आहे. या अनुषंगाने ही बैठक संपन्न झाली. मतदार याद्या अद्ययावत करण्यासाठी सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांकडून मतदान केंद्र स्तरीय प्रतिनिधी २ यांची नियुकीत केली जाणार असून प्रत्येक प्रतिनिधीला ओळखपत्र दिले जाणार आहे. मतदान प्रक्रियेत सर्व मतदारांना उत्साहित वातावरणात सहभाग घेता यावा. कमी अंतरावर मतदान केंद्र असावे. रांगा ऐवजी कमी वेळात मतदारांना मतदान करता यावे यासाठी जिल्हा निवडणूक प्रशासन कामाला लागले असून, साधारण ७१ मतदान केंद्रापेक्षा अधिकची वाढ होईल. किमान तेराशे मतदारांसाठी एक मतदान केंद्र निर्माण केले जाईल आलेल्या सर्व सूचनांचा विचार करून, निवडणूक आयोगाच्या निकषाप्रमाणे मतदान प्रक्रिया सुलभ करण्यासाठी महत्वपूर्ण निर्णय घेतले जातील असे आश्वासन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिले आहे.

## लाडकी बहीण या योजनेत महिलांनी सहभाग नोंदवावा-विष्णू वाघमारे

बीड । प्रतिनिधी

लोकनेते माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहरातील पहिला कॅम्प दिनांक ९/७/२०२४ रोजी प्रभाग क्रमांक (२) मधील माजी नगरसेवक विष्णू वाघमारे यांनी स्वतःच्या संपर्क कार्यालयामध्ये सुरू करून मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण वंचित राहू नये म्हणून पहिला कॅम्प सुरू केला.

आज पर्यंत सदरील कॅम्प मध्ये महिलांची संख्या दिवसें दिवस वाढत असल्यामुळे तब्बल पाच दिवसानंतर फॉर्म भरण्यासाठी महिलांची संख्या कमी होत नसल्यामुळे सदरील सेवा देण्याचा उद्दिष्ट एकच आहे तो म्हणजे एकही महिला या योजनेपासून वंचित राहणार नाही. हा दृष्टिकोन पुढे ठेवून जोपर्यंत प्रभागातील महिला या योजने पासून वंचित राहणार नाही तोपर्यंत सदरील कॅम्प चालू राहील. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या योजनेत लाभार्थी महिलांची नावे समाविष्ट केल्याशिवाय सदरील कॅम्प बंद होणार नाही याची सर्व महिलांनी नोंद घ्यावी. सदरील कॅम्प हा दिनांक ९ /७/२०२४ रोजी पासून सुरू असुन फॉर्म भरण्यासाठी ची वेळ सकाळी ११ ते सायंकाळी ५ दरम्यान आहे. संपर्क कार्यालयाशी या वेळेत संपर्क साधावा.ज्या महिलांना या योजनेचा लाभ घ्यायचा आहे. अशा महिलेचे वय २१ ते ६५ वर्षापर्यंत आवश्यक आहे. सदरील अर्ज भरण्यासाठी आवश्यक असणारे कागदपत्रे पुढील प्रमाणे १) आधार कार्ड (२) आधिवास प्रमाणपत्र/जन्म प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला (टि.सी)/१५ वर्षा पूर्वीचे मतदान ओळखपत्र/१५ वर्षा पूर्वीचे रेशन कार्ड यापैकी कोणतेही एक ओळखपत्र (३) उत्पन्न प्रमाणपत्र/पिवळे किंवा केशरी रेशन कार्ड (४) बँक पासबुक (५) अर्जदाराचा फोटो (६) महिलेचा जन्म परराज्य तील असल्यास पतीचे अधिवास प्रमाण पत्र/जन्म प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला/१५ वर्षा पूर्वीचे रेशन कार्ड/१५ वर्षा पूर्वीचे मतदान ओळख पत्र या पैकी कोणतीही एक ओळखपत्र विष्णू वाघमारे ९८५०५२०२२७, प्रा.सनी विष्णू वाघमारे-९६२३६७१७७७ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आज परळीत धनंजय मुंडे यांचा अभिष्टचिंतन सोहळा

**सकाळी ११.३० पासून धनंजय मुंडे शहरातील जे के फंक्शन हॉल येथे भेटून स्वीकारणार शुभेच्छा**



**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री व परळीचे लाडके आमदार धनंजय मुंडे यांचा १५ जुलै हा जन्मदिवस असून राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने परळीत धनंजय मुंडे यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन शहरातील मलकापूर रोड येथे स्थित असलेल्या जे के फंक्शन हॉल या ठिकाणी करण्यात आले आहे.

सकाळी ११:३० पासून धनंजय मुंडे हे जेके फंक्शन हॉल येथे उपस्थित राहून सहकारी कार्यकर्ते हितचिंतक यांना भेटून शुभेच्छांचा स्वीकार करणार आहेत तसेच ते सर्वांशी संवादही साधणार आहेत.

### सहकारी कार्यकर्ते, हितचिंतकांशी साधणार संवाद

**धनुभाऊंच्या वाढदिवसानिमित्त उद्या सकाळी महामॅरेथॉन, माझी लाडकी बहीण योजनेच्या नोंदणी साठी विशेष मोहीम यासह विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन**

धनंजय मुंडे यांचे राजकीय वलय मोठे असून संबंध महाराष्ट्रात त्यांचा मोठा चाहता वर्ग आहे या दृष्टीने परळी, बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रात विविध ठिकाणी अनेक कार्यकर्त्यांनी वेगवेगळ्या सामाजिक उपक्रमाचे या निमित्ताने आयोजन केले आहे.

दरम्यान ग्रीन परळी व क्लीन परळी असा निर्धार व्यक्त करणारी विशेष महा मॅरेथॉन स्पर्धा सकाळी सात वाजता आयोजित करण्यात आली असून ही स्पर्धा परळी शहर पोलीस ठाण्यात समोरच्या संत सेवालाल महाराज येथे सकाळी सात वाजल्यापासून शालेय गट, खुला गट व ज्येष्ठ नागरिक गट अशा तीन वेगवेगळ्या गटांमध्ये होणार आहे.

परळी वैजनाथ शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व मित्र पक्षांच्या वतीने राज्य सरकारने नुकत्याच घोषित केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमध्ये जनजागृती करून जास्तीत जास्त पात्र लाभार्थी महिलांना या योजनेचा लाभ मिळवून देण्याच्या दृष्टीने दिनांक १५ जुलै ते २६ जुलै या दरम्यान विशेष मोहीम राबविण्यात येणार असून प्रत्येक वार्डामध्ये महिलांना आपल्या कागदपत्रांसह या योजनेसाठी नोंदणी करण्याची सोय राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. धनंजय मुंडे यांच्या आयुरारोग्यासाठी १२ ज्योतिर्लींगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथांची महाआरती, उमर शहावली दर्ग्याला चादर, दाऊद शहा बाबांना चादर, नवमतदार नोंदणी अभियान यासह सबंध बीड जिल्ह्यात रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, अन्नदान, गरजू विद्यार्थ्यांना मदत यांसारखे अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत.

## मातोश्री ग्रामसमृद्धी पाणंद रस्ते गेले कुठे? लोकवर्गणीतून ग्रामस्थांवर रस्ते करण्याची वेळ

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाने नुकत्याच काढलेल्या आदेशाने राज्यातील मातोश्री पाणंद रस्त्यांना दर्जावाढ देण्याचा निर्णय घेतला असुन जिल्हा परिषद बांधकाम विभाग व पंचायत समितीचा वित्त आयोगाचा निधी मिळवण्याचा मार्ग मोकळा झाला असुन बीड जिल्ह्यात २५०० पाणंद रस्त्यांना दर्जावाढ मिळाल्याची प्रसार माध्यमांमध्ये गाजावाजा करणा-या जिल्हा प्रशासनाचा बुरखा सध्या पावसाळ्यात ग्रामीण भागातील ग्रामस्थांनी शासन दरबारी हेलपाटे मारुन त्रस्त ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून रस्ता कामास सुरुवात केल्याने पुरता फाटला असुन शासनाप्रती तिव्र नाराजी ग्रामस्थांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना व्यक्त केली आहे.

बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत अंतर्गत वायभट वस्ती, गिरे वस्ती, शिंदे वस्ती, मुळे वस्ती, जोगदंड वस्ती, शिंदे वस्ती येथील जवळपास एकुण २०० लोकसंख्या असलेल्या ग्रामस्थांना पावसाळ्यात गुडघाभर चिखलातून अडीच किलोमीटर अंतरावरून लेकरांची शाळा, भाजीपाला,दुधदुभतं, बाजारहाट यासाठी लिंबागणेश गावात यावं लागतं.७५ वर्षांपासून आम्हाला रस्ता मिळालाच नाही. लेकरांच शिक्षण व्हावं म्हणून लेकरं बाहेरगावी शिकायला टाकली. चिखलामुळे शेतमजूर शेतात यायला तयार नाहीत.शेवटी ४० कुटुंबातील व्यक्तींनी घरागणीस ५००० रूपये लोकवर्गणीतून २ लाख रुपये जमा केले असुन रस्ता कामाला सुरुवात केली आहे. बळीराजाचं नाव घेऊन सरकार चालवताना शेतकऱ्यांच्या रस्ता, वीज, पाणी सारख्या मुलभूत गरजा स्वातंत्र्यानंतर ७५ वर्ष उलटुनही पुर्ण करू शकत नसल्याची खंत बोलावून दाखवली. रस्ताकामासाठी अच्युत वायभट, सतिश वायभट, अभिजित गायकवाड, गणेश खिल्लारे, दिनेश जोगदंड,उमेश जोगदंड, अतुल जोगदंड,संजय पौळ, विक्की भोसले, महादेव जाधव,गोकुळ मुळे,आण्णा मुळे,बाळु मुळे,कृष्णा गिरे, गोवर्धन गिरे,सुंदरभाऊ वाणी, अशोक खिल्लारे, राजेंद्र बाबर,सतिश शिंदे, शेख शौकत यांनी पुढाकार घेतला.

## जिल्ह्यातील महिलांनी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'चा लाभ उचलावा: जिल्हाधिकारी

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात महिलांनी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'चा लाभ मिळावा, यासाठी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये दौरा करून थेट महिला पर्यंत पोहोचून योजनेची माहिती दिली.**



शनिवारी सकाळपासून जिल्हाधिकारी श्री पाठक यांनी जिल्ह्यातील गेवराई, वडवणी, पाटोदा, आंबेजोगाई, आष्टी आणि केज या तालुक्यातील नगरपंचायतीला, तसेच तालुक्यातील काही गावांमध्ये दौऱ्यादरम्यान मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजनेबाबतची माहिती दिली. या योजनेअंतर्गत लागणाऱ्या कागदपत्र तसेच कोणाच्या माध्यमातून योजनेचा लाभ घेता येईल याबद्दल सांगितले. या योजनेचा लाभ पात्र महिलांनी उचलावा, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी यावेळी केले. त्यांच्या या दौऱ्यामध्ये जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर केकान तसेच दौरा केलेल्या तालुक्यातील तहसीलदार त्यांच्यासह संबंधित विभागातील अधिकारी कर्मचारी आणि लाभार्थी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.गेवराई तालुक्यातील मादळमोही, शिरूर तालुक्यातील तिंतरवणी, पाटोदा तालुक्यातील अमळनेर , पाटोदा नगरपंचायत, आष्टी नगरपंचायत, आष्टी तालुक्यातील मुर्शिदपूर, बीड तालुक्यातील लिंबागणेश, नेकनूर , केज नगरपंचायत, तालुक्यातील होळ, आंबेजोगाई नगरपंचायत, आंबेजोगाई तालुक्यातील पिंपळगाव, पुस, बदलापूर, लोखंडी, सावरगाव व हातोला या ठिकाणी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण याबाबत समक्ष भेटी देऊन या योजनेबाबतची माहिती दिली. पात्र महिलांचा वयोगट २१ ते ६५ असून या वयोगटातील लाभार्थ्यांची फॉर्म भरून घेणे व प्रत्यक्षात मार्गदर्शन करून संबंधित योजना बीड जिल्ह्यामध्ये प्रभावीपणे

◀◀ पान ३ वर

## गस्त वाढवा ,खासदार कडाडले बीड शहरात चोरांचा सुळसुळाट

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरासह अन्य ठिकाणी चोरांचा सुळसुळाट वाढला असून या विषयात खासदार बजरंग सोनवणे यांनी पोलीस अधीक्षक यांना सूचना देऊन गस्त वाढविण्याच्या सूचना दिल्या आहेत .पत्रान्वयेसूचित करण्यात आले आहे , बीड शहर व जिल्ह्यातील अन्य भागात चोरांचा वावर असले बाबद बोलले जात आहे . बीड शहरात गयानगर भागात झालेला चोरीचा प्रकार चिंतनीय आहे .शहरातील नागरिक रात्रीची गस्त देत आहेत. नागरी जीवन असुरक्षित भावनेने भयभीत झालेले आहे . काही ठिकाणी महिला भगिनीसोबत चुकीचे प्रकार होत असल्याची चर्चा आहे . आपणास या अनुषंगाने विनंती सूचना आहेत कि आपण शहरात पोलीस गस्त अधिकची वाढवावी आणि गस्त देणाऱ्या नागरिकांना विश्वास व दिलासा द्यावा .असे पत्रात म्हटले आहे.



## सज्ञान नागरिकांनी मतदान यादीत नांवनोंदणी करावी-अनिल बोर्डे

**गेवराई । प्रतिनिधी**

**सध्या केंद्रीय निवडणूक आयोगा कडून दिनांक २५ जून ते २५ जुलै या दरम्यान मतदान नाव नोंदणी कार्यक्रम जाहीर झाला आहे तरी जिल्ह्यातील सर्व सज्ञान नागरिकांनी तात्काळ नांव नोंदणी करावी व मतदारधारकांच्या कार्डची दुरुस्ती करून करून घ्यावी या राष्ट्रीय कार्यास सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी या पत्रकाद्वारे केले आहे.**



पत्रकात म्हटले आहे की, देशात सन २०२४ यावर्षी आपल्या राज्यात महाराष्ट्रामध्ये, झारखंड हरियाणा आणि जम्मू काश्मीर येथे विधानसभा निवडणूक होणार आहेत.तसेच महाराष्ट्रातील देखील लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या म्हणजे नगरपालिका, महानगरपालिकेच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकीमध्ये सहभागी होण्यासाठी सज्ञान व्यक्तीने नांव नोंदणी करून केंद्रीय निवडणूक आयोग सहकार्य करणे आवश्यक आहे.त्यासाठी निवडणूक आयोगाने त्या भागातील नागरिकांनी मतदान पासून वंचित राहू नये यासाठी

◀◀ पान ३ वर




## जातीवाचक शिवीगाळ करून गंभीर जखमी केल्याच्या केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

किरकोळ कारणावरून जातीवाचक शिवीगाळ करत बेदम मारहाण केल्याच्या आरोपातून अंबाजोगाई येथील जिल्हा व सत्र न्या. संजश्री घरत यांनी आरोपीची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड. आर.एम. धायगुडे यांनी प्रभावी युक्तिवाद केला.




सदरील घटना २०२० साली घडली होती. या प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादीने अंबाजोगाई ग्रामीण.पोलीस स्टेशनला येऊन दिलेल्या फिर्यादीनुसार ८ सप्टेंबर २०२० रोजी रेशन वाटप असल्याने ते आणण्यासाठी फिर्यादी गेला होता. त्यावेळी गर्दी असल्याने तो गावातील मंदिराच्या ओट्यावर बसलो असताना आरोपी आबाराव तेथे आला आणि त्याचा पाय फिर्यादीच्या पायाला लागल्यामुळे दिसत नाही का असे फिर्यादी म्हणाला. त्यावेळी आबारावने जातीवाचक शिवीगाळ करत फिर्यादीच्या डोळ्याच्या वर दगड मारून फ्रॅक्चर करून त्यास गंभीर जखमी केले. सदर फिर्यादीवरून आरोपी आबाराव याचे विरुद्ध कलम ३२६, ३२३, ५०४ आणि ॲट्रॉसिटी कायद्याचे कलम ३(१)), ३(१) नुसार गुन्हा दाखल होऊन त्यास अटक झाली. अंबाजोगाईच्या उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी गुन्ह्याचा तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. या प्रकरणात सरकार पक्षातर्फे एकूण पाच साक्षीदार तपासण्यात आले. दोन्ही बाजूचे युक्तिवाद ऐकून न्यायालयाने आरोपीची निर्दोष मुक्तता केली. आरोपीच्या वतीने ॲड. आर.एम. धायगुडे यांनी काम पाहिले तर त्यांना ॲड. जी.डी. कांदे, ॲड. डी.ए. लोंढाळ, ॲड. अविनाश धायगुडे यांनी सहकार्य केले.

## केज विधानसभा मतदार संघातील विकास-कामांसाठी वाढीव ३० कोटींचा निधी मंजूर

**'स्वाराती' वैद्यकीय महाविद्यालय आणि नेकनूरच्या स्त्री रुग्णालयातील कामांसाठी मिळाला निधी**



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

केज विधानसभा मतदार संघातील विविध विकासकामांसाठी वाढी ३० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद अर्थसंकल्पातून करण्यात आली आहे. आ. नमिता मुंदडा यांच्या मागणीनंतर अंबाजोगाई येथील स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयातील मुलींच्या वस्तीगृहासाठी वाढीव २० कोटी रुपये तर नेकनूरच्या स्त्री रुग्णालयातील विविध कामांसाठी ३० लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

अंबाजोगाईच्या स्वाराती वैद्यकीय महाविद्यायातील वियार्थ्यांची वाढती संख्या आणि पूर्वीचा वसतिगृह इमारतींची दुरावस्था लक्षात घेता आ. नमिता मुंदडा यांनी प्रयत्नपूर्वक वस्ती गृहाच्या नवीन इमारतींसाठी निधी खेचून आणला. यामध्ये १६० विद्यार्थिनींच्या वसतिगृहासाठी १० कोटी ८० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. मात्र, बांधकामाच्या अंदाजपत्रकात वाढ झाल्याने वाढीव निधी मिळण्याबाबत आ. मुंदडा यांनी शासनाकडे मागणी केली होती. वास्तव लक्षात घेत शासनाच्या व्यय अग्रक्रम समितीने वाढीव बांधकाम खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देत सदर वसतिगृहासाठी एकूण ३० कोटी ४ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. तसेच, नेकनूर येथील स्त्री रुग्णालयात बसण्यासाठी शेड बांधणे, महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र शौचालये आणि पर्किंग शेड बांधणे या कामांसाठी २९ लाख ९५ हजार रुपयांच्या निधीस मंजुरी देण्यात आली आहे. लवकरच या कामांची

◀◀ पान ३ वर

## विकासाची दूरदृष्टी असणारा उद्यमशील संघर्षयोद्धा : कृषिमंत्री धनंजय मुंडे



कृषिमंत्री धनंजय मुंडे हे महाराष्ट्र राज्याच्या राजकारणाबरोबरच विधिमंडळात अग्रभागी नेत्यांमध्ये घेतले जाणारे नाव होय. अविरत कार्य, जनसेवेचा ध्यास घेऊन, ''विकास हीच जात, आणि विकास हाच धर्म'' अगदी या उक्तीप्रमाणे चोवीस तास जनहितार्थ वाहिलेले जीवन आणि 'आपला धनुभाऊ' असा सर्वसामान्यांना विश्वास असणारे खंबीर नेतृत्व आहे. महाराष्ट्राच्या राजकारणातला एक वलयांकित चेहरा, दमदार, कणखर, आश्वासक नेतृत्व आणि विकासाची दूरदृष्टी असणारा उद्यमशील संघर्षयोद्धा म्हणून कृषिमंत्री धनंजय मुंडे यांचा आजपर्यंत प्रवास राहिलेला आहे. धनंजय मुंडे साहेबांना पराकोटीचा संघर्ष करत हाल, अपेष्टा सहन कराव्या लागलेल्या आहेत. त्यांचे आयुष्य म्हणजे एक संघर्षयात्रा आहे. उद्यमशील संघर्ष आणि संकटांची मालिका काय असते? याचे उदाहरण म्हणून धनंजय मुंडे साहेबांच्या राजकीय, सामाजिक आणि खाजगी जीवनाकडे पाहता येईल. म्हणून जीवनात येणाऱ्या प्रत्येक आव्हानाला कसं भिडायचं असतं याची प्रेरणा आणि ऊर्जा मिळते. धनंजय मुंडे हे केवळ नाव नाही. ती एक कारकीर्द, एक मोहीम, एक प्रेरणा आणि लाखो लोकांसाठीची ऊर्जा आहे.संघर्ष काय असतो... संकटे काय असतात... हे तुमच्या ऐवढं जवळून कुणीच बघितल नाही. पण संकटांना घाबरुन संयम ढळू न देता अविरत संघर्ष करत तुम्ही केवळ आमदार, विरोधीपक्ष नेता, मंत्री झाला नाहीत तर स्वतः उद्यमशील संघर्षयोद्धा म्हणून सिद्ध झालात. म्हणूनचधनुभाऊ तुम्ही सर्वसामान्य माणसांच्या काळजात घर केलय... सत्ता असली काय अन्? नसली काय तुम्ही सामान्यांची साथ कधीच सोडली नाहीत. म्हणून तुम्ही आमदार, विरोधीपक्ष नेता, मंत्री म्हणून नाही तर एक भाऊ म्हणून कायम सामान्यांना पाठिराखा वाटतात. गरिबांच्या मुलींची लग्न असोत की कोरोनासारख्या महामारीत

◀◀ पान ३ वर




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# आरक्षणावरील बैठकीपूर्वी विरोधी पक्षाच्या नेत्यांना बारामतीमधून फोन'', भुजबळांचा पवारांवर गंभीर आरोप



**बारामती । प्रतिनिधी**

आरक्षणाच्या मुद्यावरुन राष्ट्रवादीचे मंत्री छगन भुजबळ यांनी आज बारामतीतून ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यावर थेट टीकास्त्र सोडले. बारामतीत आयोजित जनसन्मान मेळाव्यात भुजबळ बोलत होते.

भुजबळ म्हणाले, काही लोकांचा असा प्रयत्न आहे की आरक्षणाच्या मुद्यावरुन आपापसात भांडणं, मारामाऱ्या व्हाव्यात. मात्र, आमची भूमिका अशी आहे की, मराठा समाजाला आरक्षण मिळायला पाहिजे, छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गानेच आम्ही जाणार आहोत, फक्त ज्यांना आरक्षण मिळाले आहे, त्यांच्यावर अन्याय होणार नाही, एवढी काळजी फक्त घ्यावी.

राज्य सरकारने मुंबईत चार दिवसांपूर्वी आरक्षणाच्या मुद्यावर जी बैठक सरकारने बोलाविली, त्या बैठकीला सर्वपक्षीय नेत्यांनी त्याला उपस्थित राहावे, असा प्रयत्न होता. यात वातावरण शांत व्हावे असा प्रयत्न होता. यात मी स्वत: विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवारांना फोन केला, जितेंद्र आव्हाडांनाही फोन केला आणि त्यांना सांगितलं की काहीही करा, पण शरद पवार साहेबांनाही या बैठकीला बोलवा. व्ही.पी. सिंग यांनी जे आरक्षण देऊ केलं होतं, त्याची अंमलबजावणी शरद पवार यांनी केल्यामुळे आम्ही त्यांचे आभारही मानले होते.


राज्यात आरक्षणाचा प्रश्न निर्माण होतो, तेव्हा राज्याचे ज्येष्ठ नेते म्हणून पवारसाहेबांनी त्या बैठकीला यायला हवं होतं, पण असं सांगितलं जातं की, सगळे त्या बैठकीला येणार होते, पण पाच वाजता बारामतीहून कुणाचा तरी फोन गेला आणि विरोधी पक्षाच्या सर्वच नेत्यांनी या बैठकीवर बहिष्कार टाकला. बारामती सर्वच समाजाचे मतदार आहेत, सुनेत्रा पवारांप्रमाणेच त्यांनी सुप्रिया सुळेंनाही मते दिली आहेत, या सर्वांचे संरक्षण करण्याचे काम तुमचे नाही का? असा सवाल त्यांनी केला.

भुजबळ पुढे म्हणाले, तुमचा राग छगन भुजबळ, अजित पवार यांच्यावर असेल पण या ओबीसी समाजाने तुमचं काय घोडं मारलं आहे. हे सगळं मिटविण्यासाठी का तुम्ही या बैठकीला आमच्यासोबत येत नाही, नंतर पाठीमागून सल्ले द्यायचे, राज्य पेटविण्याचे उद्योग सध्या सुरु आहेत, निवडणुकीच्या काळात एकमेकांविरुध्द लढू, पण राज्यातील सामाजिक प्रश्न सोडविताना मुद्दाम त्याच्यावर बहिष्कार टाकायचा यायचंच नाही आणि ओबीसी व मागासवर्गीयांना वाऱ्यावर सोडायचं हे अजिबात योग्य नाही. अशा प्रश्नावर सर्वांनी एकत्र यायला हवे, असे भुजबळ शेवटी म्हणाले. दरम्यान, भुजबळ यांनी आरक्षणाचा विषय काढताच सभेत उपस्थित काही युवकांनी एक मराठा लाख मराठाच्या घोषणा दिल्या.

# १० दिवसांत उत्तर द्या अन्यथा...'! आयएएस पूजा खेडकरच्या आईला पुणे पोलिसांची नोटीस

पुणे । प्रतिनिधी

पिस्तूल दाखवून शेतकऱ्यांना धमकावल्याप्रकरणी प्रशिक्षणार्थी आयएएस पूजा खेडकरच्या आईच्या अडचणी वाढू शकतात. '१० दिवसांत उत्तर द्या अन्यथा...' अशी नोटीस पुणे पोलिसांनी पूजा खेडकरच्या आईला बजावली आहे.



पुण्याच्या पोलीस आयुक्तांनी ट्रेनी आयएएस पूजा खेडकरची आई मनोरमा खेडकर यांना नोटीस बजावली आहे. या नोटीसमध्ये त्यांना या प्रकरणी १० दिवसांत त्यांची बाजू मांडण्यास सांगण्यात आले आहे. या नोटीसमध्ये त्यांना या प्रकरणी १० दिवसांत त्यांची बाजू मांडण्यास सांगण्यात आले आहे. जर ती तसे करू शकली नाही तर तिचा बंदुकीचा परवाना रद्द केला जाईल, असेही त्यांनीही म्हटले आहे. पुणे पोलिसांनी दिलेल्या नोटीसमध्ये भारतीय न्यायिक संहिताच्या वेगवेगळ्या कलमांचा उल्लेख करण्यात आला आहे. मनोरमा खेडकर यांनी पिस्तूल दाखवल्याने तक्रारदाराच्या जीवाला धोका असल्याचेही पोलिसांनी नोटीसमध्ये म्हटले आहे.

**खेडकर यांचा व्हायरल व्हिडिओ पुणे जिल्ह्यातील मुळशीतील**

नुकताच आयएस पूजा खेडकरच्या आईचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. या व्हिडिओमध्ये पूजा खेडकरची आई मनोरमा यांना शेतकऱ्यांशी संवाद साधताना पिस्तुल हलवताना दिसत आहे. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये पूजा खेडकर शेतकऱ्यांशी बोलत असताना तिच्या हातात पिस्तूल दिसत आहे. यावेळी पूजाच्या आईसोबत काही बॉडी गार्डही होते. हा व्हिडिओ पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील असल्याचे सांगण्यात येत आहे.

# पुणे- मुंबई एक्सप्रेस वेवर बोरघाटात गुडघाभर पाणी; प्रवाशांना जीव मुठीत घेऊन करावा लागतोय प्रवास

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यासह शहर परिसरात मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. पावसामुळे काही भागात जनजीवन विस्कळीत झाल्याचं चित्र आहे. तर काही ठिकाणी रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्यामुळे नागरिकांना आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. तर पुणे- मुंबई एक्सप्रेस वे वर मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्यामुळे वाहन चालकांना मोठी मनस्ताप सहन करावा लागला आहे. खोपोली जवळील बोरघाटात मुंबईकडे(चींलरळ) जाणाऱ्या लेनवर सखल भागात पाणी मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याचं दिसून येत आहे. या मार्गावरून वाहन चालवताना चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. अक्षरशः गुडघाभर पाण्यातून वाहन चालकांना वाट काढावी लागली.



पुणे शहर परिसरात गेल्या दोन दिवसापासून मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. पुण्यातील घाटमाथा परिसरात देखील जोरदार पाऊस झाला आहे. पुण्यात पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता आहे. मॉन्सून सक्रिय झाल्याने पुणे(झीपश ठरळप) जिल्ह्यात शनिवारी दिवसभर पावसाने हजेरी लावली होती. आज (रविवारी) पहाटेपासून पावसाने हजेरी लावली आहे. आज दिवसभरात काही काळ पावसाने विश्रांती घेतली असल्याचं चित्र दिसून येत आहे. पुणे जिल्ह्यात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला असून ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आलेला आहे. पुणे(झीपश ठरळप) जिल्ह्यातील भोर, वेल्हा या भागात १०० मिलिमीटरच्या वरती पावसाची नोंद झाली आहे. तर मावळ आणि भीमाशंकर परिसरात २०० मिलिमीटरच्या वरती पावसाची नोंद झाली आहे.

# शहरात सायबर चोरट्यांचा सुळसुळाट

पुणे : शहरात सायबर चोरट्यांचा सुळसुळाट सुरू असून, शहरातील विविध पोलिस ठाण्यांत दाखल झालेल्या दहा गुन्ह्यांत सायबर चोरट्यांनी तब्बल एक कोटी ३४ लाखांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. पहिल्या गुन्ह्यात पूजा (रा. शुक्रवार पेठ) यांना अक्षय व देविका नावाच्या महिलेनी मोबाईलवर संपर्क करून शेअर मार्केटमध्ये नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून त्यांची ९ लाख ९९ हजारांची फसवणूक केली.

हा प्रकार २२ एप्रिल २०२४ ते २८ मेदरम्यान घडला. याप्रकरणी खडक पोलिस ठाण्यात आयटी ॲक्ट व फसवणुकीनुसार गुन्हा दाखल केला आहे. दुसऱ्या गुन्ह्यात इंद्रजितसिंग गांधी (वय ५१, रा. भवानी पेठ) यांना शेअर ट्रेडिंगमध्ये व आयपीओमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला नफा मिळेल, असे आमिष दाखवून त्यांचा विश्वास संपादन करण्यात आला.

त्यांना तब्बल २५ लाख ७९ हजार ५०० रुपये भरण्यास सांगून अक्षय अलांडे नामक एकाने त्यांची फसवणूक केली. याप्रकरणी खडक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार २५ एप्रिल २०२४ ते ८ जूनदरम्यान घडला. तिसऱ्या गुन्ह्यात अश्विनी राजशेखर वर्षा (२८, रा. कर्वेनगर) यांना ऑनलाइन ट्रेडिंग करण्याचे आमिष दाखवून त्यांच्याकडून सायबर चोरट्यांनी १२ लाख उकळल्याचा प्रकार समोर आला आहे.

हा प्रकार ३० मे २०२४ ते २१ मेदरम्यान घडला. त्यांनी याबाबत वारजे माळवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. चौथ्या गुन्ह्यात सायबर चोरट्याने पूजा




निखिल वागसकर (३९, रा. सोमेश्वरवाडी) यांना मोबाईलवर फोन करून तुमचे पार्सल आले असून, त्यामध्ये ड्रग असल्याची भीती दाखविली. तसचे, त्यामध्ये लॅपटॉप, काही पासपोर्ट आहेत असेही सांगितले. पूजा यांना या प्रकरणात अटक करण्याची भीती दाखवून व त्यातून सोडविण्यासाठी ५ लाख ट्रान्स्फर करण्यास भाग पाडले. हा प्रकार १९ जुलै २०२३ रोजी घडल्यानंतर आता याप्रकरणी चतु:श्रृंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पाचव्या गुन्ह्यात, उत्कर्ष खामगावकर (३४, रा. किस्टल गार्डन सोसायटी, बाणेर पाषाण) यांना मुंबईतील एनसीबी ब्रांच येथून बोलत असल्याची खोटी माहिती दिली. तसेच, आपण मुंबई पोलिसमध्ये काम करत असून, मनी लॉड्रिंगमध्ये अडकण्यापासून वाचण्यासाठी त्यांना १२ लाख ८८ हजार पाठविण्यास भाग पाडले. याबाबत चतु:श्रृंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

हा प्रकार १८ जून रोजी घडला चतु: श्रृंगी पोलिस ठाण्यात विनोद चांडक यांनी दिलेल्या फिर्यादीत त्यांची शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या बहाण्याने ९ लाख ९३ हजारांची फसवणूक केली, तर श्रीकांत अडुळकर यांची शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या बहाण्याने ४ लाख ५१ हजारांची फसवणूक केली. रविकुमार वली यांना मनी लॉड्रिंगमध्ये गुंतवणूक करण्याच्या बहाण्याने ३० लाखांची फसवणूक केली. तसेच, विनोद मेनन यांना आमच्या कंपनीत गुंतवणूक केल्यास दाम दुप्पट नफा देण्याच्या बहाण्याने त्यांची ३१ लाख ७५ हजारांची फसवणूक केली. प्रफुल्ल सम्मनवार यांना विविध टास्क करण्यास सांगून त्यांची ३९ लाख ६५ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी हडपसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे कधी जमा होणार?, 'या' दिवशी मिळणार ओवाळणी, अजितदादांची मोठी घोषणा काय?

**पुणे । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील लाखो महिलांना दर महिन्याला आता १५०० रुपये मिळणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत अर्थसंकल्प सादर करत असताना लाडकी बहीण योजनेची घोषणा केली होती. यानंतर राज्यभरात लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळावा यासाठी सेतू कार्यालये आणि तहसील कार्यालये इथे अर्ज भरण्यासाठी महिलांची गर्दी होताना दिसत आहे. राज्य सरकारने या योजनेसाठी अर्ज भरताना कागदपत्रांमध्येदेखील शिथिलता दिली आहे. तसेच ३१ ऑगस्टपर्यंत या योजनेसाठी अर्ज करता येणार आहे. असं असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज बारामतीत जन सन्मान रॅलीच्या जाहीर सभेत राज्यातील महिलांना लाडकी बहीण योजनेचे पैसे कधी मिळणार? याबाबत मोठी घोषणा केली आहे.

लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना आता लवकरच राज्य सरकारकडून आर्थिक मदत मिळणार आहे. या योजनेचं नाव मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अशी आहे. या योजनेच्या नावाशी मिळत्याजुळत्या अशा वेळेतच महिलांना आता या योजनेचा पहिला लाभ मिळणार आहे. विशेष म्हणजे महिलांना दोन महिन्यांचे एकत्र पैसे मिळणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. तसेच रक्षाबंधन सणाच्या दिवशीच मुख्यमंत्र्यांकडून आपल्या लाडक्या बहिणींना ओवाळणी म्हणून या योजनेच्या माध्यमातील पहिला आणि दुसऱ्या महिन्याचे मिळून पैसे दिले जाणार आहेत, अशी माहिती अजित पवार यांनी दिली आहे.

अजित पवार यांच्या माहितीनुसार, राज्यातील महिलांना रक्षाबंधनाच्या दिवशी म्हणजेच १९ ऑगस्ट २०२४ ला मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या दोन महिन्यांचे पैसे मिळणार आहेत. याच दिवशी राज्यभरातील लाखो महिलांच्या बँक खात्यात प्रत्येकी ३ हजार रुपये जमा होणार आहेत. त्यामुळे राज्यातील गरीब कुटुंबांना मोठा फायदा होणार आहे.

अजित पवार नेमकं काय म्हणाले?

महिलांकरीता 'लाडकी बहिण योजना' आणली. त्यावेळी माझ्यावर टीका झाली. मात्र मी त्यांना फार महत्त्व दिले नाही. माझ्या पाठीशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माझ्या सर्व लोकांचे सहकार्य आहे याची खात्री होती. त्यामुळे ही योजना चांगल्या पद्धतीने राबवू शकतो हा विश्वास मला आहे, असं अजित पवार म्हणाले.

चांद्यापासून बांद्यापर्यंत माझ्या लाडक्या बहिणीच्या खात्यात रक्षाबंधनाच्या दिवशी तीन हजार रुपये जमा होणार आहेत. तीन सिलेंडर मोफत देणार आहे. माझी महिला सक्षम व्हावी, आत्मनिर्भर व्हावी यासाठी ही योजना महायुतीने आणली आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत महायुतीला निवडून द्यायचे आहे. निवडून नाही दिले तर ही योजना मला नीट राबवता येणार नाही, असं अजित पवार म्हणाले. तसेच आता हौसे - नौसे - गौसे आमची योजना कशी चुकीची आहे हे सांगायला येतील त्यांच्यावर विश्वास ठेवू नका, असं आवाहनही अजित पवार यांनी यावेळी केलं.

## अजित पवारांचा शेतकऱ्यांना शब्द

माझ्या शेतकऱ्यांना वीज मोफत देत आहे. शेतकऱ्यांनो आता चांगले धान्य पिकवा. एक रुपयात पीकविमाही देत आहोत. एकरी पाच हजार रुपये कापूस आणि सोयाबीनला दिले आहेत. माझ्या शब्दावर विश्वास ठेवा काळजी करू नका, असा शब्दही अजित पवार यांनी यावेळी शेतकऱ्यांना दिला. विकास आणि गरीबीचा विचार करताना दूध उत्पादक शेतकऱ्यांचाही विचार केला. त्यांना वाढीव पाच रुपये अनुदान दिले आहे, असंदेखील अजित पवार यांनी यावेळी सांगितलं.

# पत्नीचा खून करुन फाशीचा बनाव; स्वप्निलचे बिंग पोलिसांकडून उघड

**पुणे । प्रतिनिधी**

चारित्र्याच्या संशयावरून पत्नीचा गळा दाबून तिला ठार मारल्याची घटना ६ जुलैला धनकवडीतील चव्हाणनगरमध्ये घडली. पत्नीने आत्महत्या केल्याचा बनाव करणाऱ्या पतीचे सहकानगर पोलिसांनी बिंग उघड करत त्याला बेड्या ठोकल्या आहेत.

अंजली स्वप्निल मोरे (वय २९, रा. पांचाळ वस्ती, चव्हाणनगर, धनकवडी) असे आत्महत्या करणाऱ्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी तिचा पती स्वप्निल मोरे (वय ३०, रा. घोरपडी पेठ) याला पोलिसांनी अटक केली आहे. पोलिस उपनिरीक्षक रेश्मा साळुंके यांनी सहकारनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अंजली आणि स्वप्निल यांचे काही वर्षांपूर्वी लग्न झाले होते. मात्र, लग्नानंतर काही महिन्यांतच स्वप्निल हा अंजलीच्या चारित्र्यावर संशय घेऊ लागला. तिच्यासोबत सातत्याने भांडण करून मानसिक त्रास देऊ लागला. पत्नीच्या चारित्र्याच्या संशयातून ६ जुलैला दोघात वादावादी झाली. त्याच रागातून त्याने पत्नी अंजलीचा गळा आवळून खून केला. त्यानंतर खून पचविण्यासाठी त्याने पत्नीच्या आत्महत्येचा बनाव रचला.

पत्नी अंजलीने आत्महत्या केल्याचे दर्शविण्यासाठी त्याने तिला दोरीने घराच्या छताला लटकवले. त्यानंतर पोलिस नियंत्रण कक्षाला माहिती देऊन पत्नीने गळफास घेतल्याचे सांगितले. याप्रकरणी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. त्या वेळी काही गोष्टी संशयास्पद वाटल्यामुळे पोलिसांनी कसून चौकशी केली.

सहकारनगर पोलिस पथकातील अंमलदारांना पत्नीचा खून करून पती पळून गेला असल्याची माहिती मिळाली. पतीला ताब्यात घेतले. त्या वेळी स्वप्निलने पत्नी अंजलीचा खून केल्याची कबुली दिली. पोलिस निरीक्षक उत्तम भजनावळे, पोलिस उपनिरीक्षक युवराज पोठरे, रेश्मा साळुंखे, किरण कांबळे, महेश मंडलिक, अमोल पवार, सागर सुतकर यांच्या पथकाने आरोपी पतीला बेड्या ठोकल्या.

# गावठी हातभट्टीची दारु तयार करणारा ताब्यात; पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेची कारवाई

पुणे लोणीकंद पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या अष्टापूर ग्रामपंचायत हद्दीतील फळीवस्ती येथील ओढ्यालगत सुरु असलेल्या गावठी हातभट्टीची दारू तयार करणाऱ्या एका व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेनी ही कारवाई केली आहे.

झींपश उीळाश छश्ुी: पुणे पोलिसांच्या(झींपश झेश्रळलश) गुन्हे शाखेकडून बनावट गावठी हातभट्टी बनवणारा कारखाना उध्वस्त केल्याची माहिती समोर आली आहे. लोणीकंद पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या अष्टापूर ग्रामपंचायत हद्दीतील फळीवस्ती येथील ओढ्यालगत सुरु असलेल्या गावठी हातभट्टीची दारू तयार करणाऱ्या एका व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेनी ही कारवाई केली आहे. रामभोला मकाशी नानावत (वय-२०, रा. फळीवस्ती, अष्टापूर, ता हवेली, जि पुणे) असे गुन्हे शाखेनी अटक करण्यात आलेल्या आरोपीचं नाव आहे.



या प्रकरणी पोलिसांनी(झींपश झेश्रळलश) दिलेल्या आधिक माहितीनुसार, गुन्हे शाखेच्या युनिट ६ चे पथक लोणीकंद पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या अष्टापूर ग्रामपंचायत हद्दीत गस्त घालत असताना त्यांना याबाबतची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार फळीवस्ती येथील ओढ्यालगत पोलिसांनी छापा टाकला असता रामभोला नानावत हा भट्टी लावून दारू काढत असल्याचे दिसून आले.त्यानंतर कारवाई करत पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलं आहे.

पोलिसांनी(झींपश झे-श्रळलश) यावेळी केलेल्या कारवाईमध्ये रामभोला नानावत याच्या ताब्यात २ हजार लीटर कच्चे रसायन (गुळ, नवसागर, तुरटी मिश्रित), १ मोठा लोखंडी बॅरल, ३५ लीटर तयार दारू असा एकूण ५० हजार रूपये किमतीचा मुद्देमाल आढळून आला आहे. आरोपीवर महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ब)(क)(फ) अन्वये गुन्ह्याची नोंद करण्यात आला आहे.

लोणीकंद पोलीस ठाण्या येणाऱ्या हद्दीमध्ये अष्टापूर ग्रामपंचायत हद्दीतील फळीवस्ती येथील ओढ्यालगत सुरु असलेल्या गावठी हातभट्टीची दारू तयार करणाऱ्या एका व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेनी ही कारवाई केली आहे. रामभोला मकाशी नानावत (वय-२०, रा. फळीवस्ती, अष्टापूर, ता हवेली, जि पुणे) असे गुन्हे शाखेनी अटक करण्यात आलेल्या आरोपीचं नाव आहे.

या संपुर्ण प्रकरणाची माहिती गुन्हे शाखेच्या युनिट ६ चे पथक लोणीकंद पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या अष्टापूर ग्रामपंचायत हद्दीत गस्त घालत असताना त्यांना मिळाली. त्यानंतर त्यांनी लगेच कारवाई करत रामभोला नानावत याला ताब्यात घेतलं. त्याचबरोबर भट्टी लावून दारू काढत असलेले सामान देखील यावेळी नष्ट करण्यात आलं आहे.

cmyk